CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

धाराशिव | बुधवार, २२ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक १३३ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## सलगर शाळेच्या पुढाकारातून सहा हजार वह्यांचे विद्यार्थ्यांना वाटप

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, सलगरचे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या पुढाकारातून सीएसआर योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या २०० पानी ६ हजार वह्यांचे हत्तीकणबस केंद्रातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. सन २०२१ पासून पोतदार यांनी आतापर्यंत सुमारे २५ हजार वह्यांचे वाटप करून उल्लेखनीय कार्य केले आहे. कार्यक्रमास पंचायत समितीच्या सभापती रश्मी हिप्परगी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी विविध शाळांच्या मुख्याध्यापकांकडे विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वितरण करण्यात आले. दत्तात्रय पोतदार यांनी शाळेच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून ही मदत तालुक्यातील अधिक गरजू शाळांपर्यंत पोहोचविण्याची अपेक्षा व्यक्त केली. सूत्रसंचालन शाळेचे पदवीधर शिक्षक दिनकर भारती यांनी केले. कार्यक्रमास हणमंतराव गुंडरगी, तबस्सूम बागवान, संध्या बशेट्टी, प्रशांत वागदरीकर, गोदाबाई पाटील, दिनकर भारती उपस्थित होते. याप्रसंगी सरपंच रूपाली बोरगाव, युवा नेते प्रवीण शटगार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसलिंगप्पा भासगी, उपाध्यक्षा रूपाली म्हेत्रे, सदस्य उमेश डोंगराजे, सोनाली भारती, राजश्री चिकमळ, शांता आरेनकेरी, चंद्रकांत संगोळगी, राजशेखर पोलासे उपस्थित होते.



## अखिल भारत पद्मशाली संघम महिला विभागाच्या सचिवपदी माधवी अंदे

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

पश्चिम महाराष्ट्र प्रांत पद्मशाली संघम (महिला विभाग) यांच्या माजी अध्यक्षा माधवी अंदे यांची अखिल भारत पद्मशाली संगम महिला विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती तेलंगणा राज्यातील पद्मशाली भवन, नारायणगुडा, हैदराबाद येथे पार पडलेल्या कार्यक्रमात जाहीर करण्यात आली. नियुक्तीनंतर आयोजित विशेष सत्कार सोहळ्यात अखिल भारत पद्मशाली संगमचे अध्यक्ष स्वामी अण्णा कंदगटला यांचा श्रीनिवास आंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच अखिल भारत पद्मशाली संगम महिला विभागाच्या अध्यक्षा, अधिवक्ता व कौटुंबिक समुपदेशक वनम दुष्यंतला विश्वनाथ यांचा माधवी आंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## पान मसाला, सुगंधित सुपारी व गुटखा गुन्ह्यातील आरोपींचा जामीन मंजूर

**बार्शी, दि. २१ जुलै-**

महूद गावातील अन्न आणि औषध प्रशासनाकडून सहा दुकाने सीलबंद करुन प्रतिबंधित पान मसाला, सुगंधित सुपारी व गुटखा या गुन्ह्यामधील पुरवठादार व अन्य आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ ,२७४, २७५, १२३ व अन्नसुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये सांगोला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्यातील तीन पुरवठादार १)आसिफ तांबोळी, रा.दिघंची, २) जुबेर तांबोळी, रा.दिघंची ३) नयुम तांबोळी, रा. आटपाडी यांनी पंढरपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात तीन अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केलेले होते. आरोपींच्यावतीने ॲड .मुजाहिद तांबोळी, बार्शी यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, मुळात पोलिसांसमोर दिलेला कबुली जबाब हा अस्वीहाकार्य पुरावा असल्याने सहआरोपीने दिलेला जबाब हा या आरोपीविरुद्ध सबळ पुरावा म्हणून वापरता येणार नाही व गुन्ह्यात लावलेली कलमे हे लागू होत नाही. तसेच पोलीस तपासामध्ये त्रुटी आहेत, असे मुद्दे मांडले व सरकारी पक्षाने देखील आरोपी हे सराईत गुन्हेगार आहेत म्हणून आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर व्हावा, अशी विनंती केली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून पंढरपूर येथील जिल्हा न्यायाधीश श्रीमती तृप्ती मिटकरी यांनी आरोपींचा योग्य त्या अटी शर्तीवर अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

## निधन वृत्त...

### मुकूंद बंडगर



**सोलापूर, दि. २१ जुलै-**

मुकूंद यशवंत बंडगर (वय ७१, रा. उडचण हट्टी, ता. अक्कलकोट) यांचे सोमवारी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी सकाळी ११ वाजता उडचण हट्टी येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात आई, दोन मुले, मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. भाजपाचे कार्यकर्ते आणि महानगरपालिका परिवहन समितीचे माजी सदस्य शंकर बंडगर यांचे वडील होते.

### गोपाळ नागणे



**मंगळवेढा, दि. २१ जुलै-**

मूळचे मंगळवेढयाचे हल्ली सोलापूर स्थित प्रसिध्द स्थापत्य अभियंते गोपाळ बापू नागणे (वय ८०) यांचे सोमवार दि.२० जुलै रोजी निधन झाले. ते मंगळवेढयामधील जुने पहिले इंजिनियर,कॉन्ट्रॅक्टर होते. उजनी धरण बांधकामात त्यांनी उत्तम प्रकारे सेवा बजावलेली आहे. मंगळवेढा मधील शासकीय पाणीपुरवठ्याच्या टाक्या त्यांच्या सेवेतून झालेल्या आहेत. त्यांच्या पाठीमागे पत्नी,मुलगा, मुलगी,सुन,जावई, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त मुख्याध्यापक लक्ष्मण नागणे यांचे ते चुलते होत.

# रिमझिम पावसात तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा बोरगांव मुक्कामी विसावला

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ जुलै-**

जगतगुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सोमवार दि २० रोजी अकलूज येथील मुक्काम संपवून रिम झिम पावसाच्या सरीत बोरगांव येथील पालखी तळावर मंगळवारी विसावला.

यावेळी बोरगांव ग्रामपंचायतीच्या वतीने तोफांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले यावेळी डीसीसी बॅन्केचे माजी व्हा. चेअरमन ॲड. प्रकाश पाटील, राजकुमार पाटील, सरपंच सारिका गोसावी, उपसरपंच मरनसिंह पाटील, प्रतापराव पाटील, पोलिस पाटील मनिषा पाटील यांनी पादुका पूजन केले. दरम्यान माळीनगर येथील दुपारचे भोजन व विश्रांती घेवून पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले. पालखी सोहळा महाळुंग येथे आल्यावर महाळुंग-श्रीपूर नगर पंचायतीच्या वतीने नगराध्यक्ष लक्ष्मी अशोक चव्हाण, उपनगराध्यक्ष भिमराव रेडे - पाटील तसेच नगरसेवक यांनी पालखीचे स्वागत करून पादुकांचे पूजन केले.

यानंतर कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यातर्फे उपाध्यक्ष कैलास खुळे, संचालक भगवान चौगुले, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी यांनी पालखीचे स्वागत करून पादुकांचे पूजन केले. तर बृहन महाराष्ट्र शुगर तसेच सर्वत्र टेक्नॉलॉजीचे अध्यक मंदार आगाशे, ब्रिमा सागर महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक भरतकुमार सेठीया, व्यवस्थापक दिनकर बेंबळकर यांनीही पालखीचे स्वागत कुरुन पादुकांचे पूजन करण्यात आले. यानंतर नागरिकांना पादुकांचे दर्शन घेण्यासाठी मारुती मंदीरा जवळ पालखी थांबविण्यात आली. यानंतर बोरगांव येथे शामियान्यात पालखी मुक्कामासाठी विसावली. नेहमी प्रमाणे या वर्षाही पालखी तळावर शासनाचे व विनिध धर्मादाय संस्थातर्फे वारकऱ्यांसाठी औषधोपचार, मसाजची सेवा ठेवण्यात आली होती. पालखीतील वारकऱ्यांना कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना, ब्रिमा सागर, ट्रक मालक चालक संघ, दि. बृहन्महाराष्ट्र शुगर सिडिकेट, मेजर चंद्रकांत साळुंखे, पार्किंग ग्रुप यांच्यातर्फे अल्पोपहार देण्यात आला. तर श्रीपाद जाधव यांनी वारकऱ्यांची मोफत दाढी कटिंग तर संजय नाटकळे व कुटूंबानी मोफत पाच हजार चहा वाटप केला.



**वारीच्या वाटेवर निष्काम भावनेने केली जाणारी ही परमार्थिक सेवा म्हणजेच मानवी रूपातील विठ्ठलाची खरी भक्ती आणि भक्तांमधील अतूट नाते होय.**






## पांगरी येथे ६१५ नागरिकांची आरोग्य तपासणी

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ जुलै-**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर, नेरुळ यांच्यावतीने तुळजापुरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील तसेच सोलापूर जिल्हा विधान परिषदेचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखालीबार्शी तालुक्यातील पांगरी येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन सोलापूर जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड. रणवीर राजेंद्र राऊत यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिरामध्ये हृदयरोग, त्वचारोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा, बालरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, पोटाचे विकार अशा विविध आजारांची ६१५ रुग्णांची मोफत तपासणी करुन औषधोपचार करण्यात आले. त्यापैकी ११३ रुग्णांवर तेरणा हॉस्पिटल,नेरुळ येथे मोफत उपचार करण्यात येणार आहेत. भारतीय जनता पार्टी डॉक्टर सेलचे तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र डोके यांनी सांगितले की, पांगरी गावासाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. तेरणा हॉस्पिटलने मोफत तपासणी करुन गोरगरीब नागरिकांना मोठा दिलासा दिला. स्व.अजितदादा पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारांना अनुसरुन आम्ही गावात आरोग्य सुविधा वाढवण्यासाठी प्रयत्नशील राहू.

## अरिहंत स्कूलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये संस्थाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. अजय पोन्नम यांच्या वाढदिवसानिमित्त दि. २० जुलै रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इ.८ वी, ९ वी व १०वीच्या विद्यार्थ्यांची गीतगंगा फाउंडेशन च्या वतीने रक्तगट तपासणी करण्यात आली. शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पहिली ते ३ रीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व इ. ४ थी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांना माननीय अध्यक्षांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. नर्सरीच्या विद्यार्थ्यांना बर्थडे कॅप वाटप करण्यात आले. तसेच प्राथमिकच्या सर्व विद्यार्थ्यांना




खाऊ वाटण्यात आला. मानवी मूल्यांची जपणूक व्हावी आणि नि:स्वार्थी भावनेने यथाशक्ती दान ही संकल्पना रुजावी या उद्देशाने क्युरिअस किड्स इंटरनॅशनल प्री स्कूल मधील विद्यार्थ्यांच्या वतीने गरजू वृद्धांना अन्नदान करण्यात करण्यात आले, यातून विद्यार्थ्यांच्या मनात समाजसेवेचे बीज रुजवण्यात आले. तसेच चंद्रकांत पोन्नम व लक्ष्मी पोन्नम यांच्या हस्ते एलगुलवार अंध व मुकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना मिष्टान्न देण्यात आले. यावेळी संस्थाध्यक्ष डॉ. अजय पोन्नम, संचालिका सौ.सुलक्षणा पोन्नम चि. रामकृष्ण पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका अर्चना महांकाळ, ज्योती आडम, रुपाली निकते, चन्नेश इंडी, गितगंगा फाउंडेशन चे व्यंकटेश कंची तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## ९० अर्जांपैकी ७० सेवानिवृत्त उमेदवारांच्या मुलाखती

**महापालिकेतील ५१ रिक्त पदे करार पद्धतीने भरणार**

**सोलापूर, दि. २१ जुलै-**

महापालिकेतील विविध विभागातील ५१ रिक्त पदे करार पद्धतीने भरण्यासाठी मंगळवारी सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या भरतीसाठी प्राप्त ९० अर्जांपैकी ७० उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते.

महापालिकेच्या विविध विभागांतील रिक्त पदे करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून भरण्याच्या प्राथमिक प्रक्रियेला मंगळवारी सुरुवात झाली. या भरतीसाठी महापालिकेने यापूर्वी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानुसार एकूण ९० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ७० सेवानिवृत्त उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. दहा उमेदवार अनुपस्थित राहिले तर यासाठी दहा युवा उमेदवारांनीही अर्ज केले होते. मात्र, ही भरती प्रक्रिया केवळ सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असल्याने युवा उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या नाहीत.

या भरती प्रक्रियेत सहाय्यक अभियंता (१), कनिष्ठ अभियंता (४), सहाय्यक कनिष्ठ अभियंता (३), वरिष्ठ मुख्यलेखापरीक्षक (८), वरिष्ठ श्रेणी लिपिक (५) आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक (३०) अशी एकूण ५१ पदे करार पद्धतीने भरली जाणार आहेत. मनपा अतिरिक्त आयुक्त वीणा पवार , संदीप कारंजे, उपायुक्त सोनाली यादव, सहाय्यक आयुक्त युवराज गाडेकर, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर , कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, मुख्य लेखापरीक्षक सदानंद वाघमोडे आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र उमेदवारांची निवड करून त्यांची संबंधित विभागांमध्ये नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

## आषाढी वारी यशस्वी करण्यासाठी २५ हजारांहून अधिक मनुष्यबळ तैनात

### १२० किमी मार्गावर १०२ वारकरी सुविधा केंद्र; भक्ती विठ्ठलाची..सेवा वारकऱ्यांची

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ जुलै -**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक सुविधा उभारल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील पालखी मार्गाची लांबी १२० किमी असून या मार्गावर ९१ ग्रामपंचायती, नगरपरिषदा व महानगरपालिका क्षेत्रांचा समावेश आहे. ही वारी यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने केलेले सूक्ष्म नियोजन व त्याची अंलबजावणी करण्यासाठी २५ हजार ५०० अधिकारी- कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी कर्मचारी दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडत आहेत.

पालखी मार्गावर एकूण १०२ वारकरी सुविधा केंद्र उभारण्यात आली आहेत. यामध्ये ४,८२,७७७ चौरस फूट क्षेत्रात ३७ जलरोधक मंडप आणि ४,९४,००० चौरस फूट क्षेत्रात २३ जर्मन हँगर मंडपांचा समावेश आहे. निवारा, विश्रांती व भोजनासाठी ही केंद्रे सज्ज ठेवण्यात आली आहेत.

**स्वच्छता व अनुषंगिक सेवा**

स्वच्छतेवर विशेष भर देताना मार्गावर ६२५० फिरती शौचालये, ४९२१ कायम स्वरूपी शौचालये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. स्वच्छतेसाठी १९५५ स्वच्छता सेवक आणि १२६ सक्शन व जेटिंग वाहने तैनात करण्यात आली आहेत.

**पाणी व महिला वारकरी सुविधा**

पिण्याच्या पाण्यासाठी ३२१ पाणी टँकर व १५९ पाणी उद्भव स्त्रोतांची व्यवस्था करण्यात आली आहे. महिला वारकऱ्यांसाठी ४१०० महिला स्नानगृहे व १७९ हिरकणी कक्ष उभारण्यात आले आहेत.

**आरोग्य व मनुष्यबळ**

आरोग्य सुविधेंतर्गत २१ अतिदक्षता विभाग व १२१ आरोग्य दूत-बाईक ॲम्ब्युलन्स तैनात आहेत. संपूर्ण यंत्रणेसाठी १०६५ अधिकारी व २४,४३५ कर्मचारी असे एकूण २५,५०० हून अधिक मनुष्यबळ कार्यरत आहे.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व यंत्रणा २४ तास कार्यरत असून 'भक्ती विठ्ठलाची... सेवा वारकऱ्यांची' या भावनेतून प्रशासनाने नियोजन केले आहे. अनेक मानाच्या पालकांनी सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश केलेला असून प्रशासनाच्या वतीने त्यांचे मोठया उत्साहाने व भक्तिभावाने स्वागत केलेले आहे. प्रशासनाने उपलब्ध केलेल्या सर्व सोयी सुविधा प्रत्यक्ष वारकरी भाविक यांच्याकडून वापरल्या जात असून त्याबद्दल ते समाधानही व्यक्त करत आहेत.



# खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा? सारोळे परिसरातील रस्त्यांची दुरवस्था

### 'एकता महिला मंच'चा तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि. २१ जुलै-**

बार्शी तालुक्यातील सारोळे आणि परिसरातील ग्रामीण भागाला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची दुरवस्था अत्यंत बिकट झाली असून, प्रवाशांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या भागात पावसाळा नुकताच सुरू झाला असून, पहिल्याच पावसात या मार्गांवरून चालणेही अशक्य झाले आहे. जवळगावपासून सारोळ्याकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की, हा मार्ग म्हणजे वाहनचालकांसाठी एक मृत्यूचा सापळा ठरत आहे. रस्त्यांची ही दुरवस्था पाहून एखादा नवीन शासकीय अधिकारी किंवा अनोळखी व्यक्ती या गावांकडे येण्यास धजावत नाही, अशी नामुष्कीजनक परिस्थिती झाली आहे.

**चिखलातून जीवघेणी कसरत**

सारोळे गावाची लोकसंख्या साधारण १८०० ते १९००च्या आसपास असून, या ठिकाणी पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी हायस्कूल आहे. त्यामुळे दररोज शेकडो विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. मात्र, सारोळ्यावरून पुढे भांडेगाव, काटी आणि कासारीकडे जाणाऱ्या रस्त्यांवर चिखल आणि पाण्याचे मोठे साम्राज्य पसरले आहे. शाळा गाठण्यासाठी चिमुकल्या विद्यार्थ्यांना दररोज या गुडघाभर चिखल-पाण्यातून कसरत करत वाट काढावी लागत आहे. रस्त्यावरील धोकादायक खड्ड्यांमुळे राज्य परिवहन मंडळाच्या बसेस (एस.टी.) आणि इतर वाहनचालकांना कसरत करावी लागत असून, बस फेऱ्याही अनियमित



झाल्या आहेत.

**रुग्णांचा जीव टांगणीला**

गेल्या १० ते १२ वर्षांपासून या परिसरातील रस्त्यांची अवस्था 'जैसे थे' आहे. एका दशकापेक्षा जास्त काळ उलटूनही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला या रस्त्याची साधी दुरुस्ती करता आलेली नाही, यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते? या दीर्घकालीन दुर्लक्षामुळे गावातील वृद्ध, आजारी व्यक्ती, महिला आणि विशेषतः गरोदर मातांची फरफट होत आहे.

**महिला आणि वृद्धांचा तीव्र संताप**

रस्त्यांच्या या दुरावस्थेचे सर्वाधिक चटके महिला, शाळकरी मुली आणि वृद्धांना सहन करावे लागत आहेत. चिखलातून चालताना होणारा त्रास आणि अपघातांच्या भीतीमुळे गावागावांतून आता महिलांचा तीव्र आक्रोश पाहायला मिळत आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून हे रस्ते युद्धपातळीवर बनवून द्यावेत, अशी मागणी होऊ लागली आहे.

**तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडू**

'सारोळे आणि आसपासच्या खेड्यापाड्यातील नागरिकांना, महिलांना आणि शाळेत जाणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना दैनंदिन प्रवासासाठी अत्यंतकठीण परिस्थिती का सामना करावा लागत आहे. गेल्या १०-१२ वर्षांपासून प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी या क्षेत्राकडे दुर्लक्ष केले आहे. एखादा मोठा अधिकारी किंवा पाहुणा गावाच्या रस्त्यामुळे यायला तयार होत नाही, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. हा मुख्य रस्ता जर प्रशासनाने तातडीने आणि दर्जेदार पद्धतीचा दुरुस्त करून दिला नाही, तर 'एकता महिला मंच'च्या वतीने प्रशासनाविरोधात तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडू. जोपर्यंत रस्ता पूर्ण होत नाही, तोपर्यंत आम्ही एक पाऊलही मागे हटणार नाही.

- **पूजा भोसले,** प्रमुख, एकता महिला मंच

CMYK



सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २२ जुलै २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



इतिहासाने जेव्हा डोळे उघडले तेव्हापासून आम्ही एक राष्ट्र म्हणून विद्यमान आहोत. आमची एक अस्मिता आहे. त्या अस्मितेला वर्तमानकाळात हिंदू अस्मिता हेच समर्पक नाव ठरेल. भारतीयांचे हिंदुत्व नाकारणे म्हणजे शीड नसलेली नौका या विश्वसागरात हाकण्यासारखे आहे.

**- स्व. मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# राहुल गांधी, प्रियांका वढेरा ताब्यात

## पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर काँग्रेसचे धरणे आंदोलन

**नवी दिल्ली, २१ जुलै**

नीट परीक्षेतील गैरव्यवहाराच्या मुद्यावर आक्रमक भूमिका घेत काँग्रेस पक्षाने मंगळवारी ७ लोककल्याण मार्ग या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर धरणे दिले. राहुल गांधी ऐकत नसल्यामुळे पोलिसांनी त्यांना आणि अन्य काँग्रेस नेत्यांना बळाचा वापर करत ताब्यात घेतल्यानंतर रात्री उशिरा सोडले.

काँग्रेस पक्षाने नीट परीक्षेच्या मुद्यावर संसदेत आणि संसदेबाहेर अशा दोन आघाड्यांवर संघर्ष करण्याची भूमिका घेतली असल्याचे आजच्या घटनाक्रमावरून दिसून आले. तसेच सपाचे अखिलेश यादव यांनाही ताब्यात घेतले. त्यानंतर सर्व आंदोलकांना हटवत पंतप्रधान निवासस्थानासमोरील परिसर रिकामा केला. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या प्रियांका वढेरा, काँग्रेस महासचिव के.सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसच्या खासदारांनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर मंगळवारी दुपारी अचानक धरणे आंदोलन सुरू केले. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येत खासदार आणि काँग्रेस कार्यकर्ते आहेत. या धरणे आंदोलनात सर्वसामान्य जनतेनेही सहभागी व्हावे, असे आवाहन राहुल गांधी यांनी केले होते. राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस नेते पंतप्रधान निवासस्थानासमोर धरण्यावर बसले असल्याचे समजल्यावर दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांनी धाव घेतली.

आंदोलनात सहभागी होण्यासाठी राहुल गांधी, प्रियांका वढेरा आणि अन्य नेते खडगे यांच्या राजाजी मार्ग निवासस्थानावरुन पायीपायी या ठिकाणी आले. काँग्रेस नेते सांकेतिक हातकडी लावून आंदोलन करत होते.

(तभा वृत्तसेवा)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोरून राहुल गांधी आणि प्रियांका यांना ताब्यात घेताना पोलिस

### राहुल गांधी यांनी केले घूमजाव

राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस नेते पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर धरण्यावर बसले असल्याचे समजल्यावर सरकारतर्फे पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्रसिंह त्यांच्याशी चर्चा करायला धरणेस्थळी पोहोचले. डॉ. जितेंद्रसिंह यांनी राहुल गांधी आणि अन्य नेत्यांशी चर्चा करत त्यांना धरणे आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. मात्र राहुल गांधी आपल्या भूमिकेवर अडले होते. नीट पेपरफूट आणि संबंधित मुद्यांवर संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा करायला सरकार तयार असल्याचे आश्वासन डॉ. जितेंद्रसिंह यांनी दिले. मात्र धरणे आंदोलन मागे घेण्याऐवजी राहुल गांधी यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राहुल गांधी यांनी आपल्या मागणीवर घुमजाव केले असल्याचा आरोप नंतर डॉ. जितेंद्रसिंह यांनी केला.



# पावसामुळे मिळाली पिकांना संजीवनी

## पाच दिवसांचा अलर्ट जारी

**नागपूर, २१ जुलै**

विदर्भातील बहुतेक सर्वच भागांमध्ये सोमवारी रात्रीपासून पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी तो दमदार कोसळला, तर काही ठिकाणी दिवसभर रिपरिप सुरू होती. यामुळे विदर्भातील वाळत असलेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली.

आगामी ५ दिवस कोकण किनारपट्टी, घाटमाथा आणि पूर्व विदर्भात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, या भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, कोकण आणि घाटमाथा, किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये पुढील ५ दिवस मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. पूर्व विदर्भात दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

सध्या मान्सून सक्रिय आहे; परंतु अरबी समुद्र किंवा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र किंवा कोणतीही मोठी हवामान प्रणाली सक्रिय नसल्यामुळे ढग जमा होऊनही सार्वत्रिक असा मुसळधार पाऊस पडत नाही, असे हवामान विभागाने स्पष्ट केले. अल निनोचा प्रभाव जूनपासूनच सुरू झाला. मात्र, चार-पाच दिवसांच्या पावसावरून अल निनोचे विश्लेषण करता येत नाही.

पालघर, नाशिक व कोल्हापूर घाटमाथ्यासह जळगाव, बुलढाणा, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे.

**२४ तासात अतिवृष्टीची शक्यता...**

पुढील २४ तासांत भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यांत काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविली आहे.

**कोकणात जोर वाढणार**

कोकणातील किनारी भाग आणि लगतच्या घाट परिसरात पुढील २ ते ३ दिवस वाऱ्याचा वेग आणि पावसाचा जोर कायम राहील. पुढील २४ तासांत दक्षिण मध्य महाराष्ट्र, कोकण आणि घाट क्षेत्रात काही ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम, तर विदर्भात काही भागांत मध्यम ते जोरदार पाऊस हजेरी लावू शकतो.

(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### बाजारात घसरणीचे सत्र सुरूच

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी घसरण पाहायला मिळाली. कच्च्या तेलाचे वाढते दर आणि मोठ्या खाजगी बँकांमधील विक्रीमुळे बाजारात चढ-उतार राहिले. मात्र, चांगल्या कॉर्पोरेट निकालांमुळे आणि बाजारातील शेवटच्या तासातील खरेदीमुळे सुरुवातीचा मोठा तोटा भरून काढण्यात यश आले. सुरुवातीच्या संथ वाटचालीनंतर, सकाळी बाजारावर प्रचंड दबाव आला. मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे कच्च्या तेलाचे दर भडकल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण होते. यामुळे निफ्टी २४,१३५.६५ च्या सत्रातील नीचांकी पातळीवर खाली आला. परंतु, सत्राच्या शेवटच्या टप्प्यात झालेल्या जोरदार खरेदीने बाजाराला सावरले आणि निफ्टी २४,२०० च्या जवळ बंद झाला. दिवसअखेर सेन्सेक्स २३८.४१ अंकांनी म्हणजेच ०.३१ टक्क्यांनी घसरून ७७,४७०.११ वर बंद झाला, तर निफ्टी ५०.८० अंकांनी म्हणजेच ०.२१ टक्क्यांनी घसरून २४,१८७.७० वर स्थिरावला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत व्यापक बाजाराने चांगली कामगिरी केली.



### कारची दोन दुचाकींना धडक; चार जखमी

**बीड :** महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात भरधाव वेगाने येणाऱ्या कारने दोन दुचाकींना धडक दिल्याने, दोन किशोरवयीन भाऊ आणि एक वडील-मुलगा यांच्यासह चार जण गंभीर जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. ही घटना सोमवारी आष्टी तालुक्यात बीड-अहिल्यानगर रस्त्यावर घडली. वाहन महामार्गाच्या विरुद्ध दिशेच्या लेनमध्ये भरकटले आणि समोरून येणाऱ्या दोन्ही दुचाकींना धडकले. या धडकेत कारचा पुढचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला, असे पोलिसांनी सांगितले. स्थानिक रहिवासी घटनास्थळी धावून आले आणि चारही जखमींना काडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील तपास सुरू आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू देणार नाही

**नवी दिल्ली, २१ जुलै**

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणाला खेळू दिले जाणार नाही, नीट पेपर फूट प्रकरणातील दोषी व्यक्तींना सोडणार नाही, त्यांच्यावर कठोरातील कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.



मंगळवारी संसदभवन परिसरात झालेल्या रालोआ खासदारांच्या मंगल मिलन बैठकीला संबोधित करतांना मोदी म्हणाले की, पेपरफूट प्रकरण हे घोर पाप आहे. नीट परीक्षेतील पेपर फूट प्रकरण हा राष्ट्रीय चिंतेचा मुद्दा आहे. स्पर्धा परीक्षांची पवित्रता आणि विश्वसनीयता कायम राखणे ही सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी त्वरित आणि समन्वित प्रयत्नांची गरज आहे. संसदेच्या अधिवेशनात खासदारांनी सक्रिय राहावे, आणि विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी कामाला लागावे, असे आवाहन मोदी यांनी केले. मोदी यांनी आपल्या विदेश दौऱ्यातील उपलब्धींची माहितीही यावेळी दिली.

बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह, राज्यसभेतील सत्ता पक्षनेते जे.पी. नड्डा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह सर्व केंद्रीय मंत्री आणि भाजपा तसेच रालोआचे खासदार उपस्थित होते. बैठकीत आपसोडून भाजपात आलेल्या राघव चढ्डा यांच्यासह अन्य खासदारांचे सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी स्वागत केले. या बैठकीतील कामकाजाची नंतर किरेन रिजिजू यांनी पत्रकारांना माहिती दिली.

(तभा वृत्तसेवा)

## कॉक्रोच पार्टीच्या प्रवक्तेपदावरून विजेता दहियाला हटवले

**नवी दिल्ली, २१ जुलै**



दिल्ली येथील जंतरमंतरवर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान कॉक्रोच पार्टीने पक्षांतर्गत मोठी कारवाई केली. पक्षाच्या धोरणांशी तडजोड करीत असंवेदनशील वर्तन केल्याचा ठपका ठेवत पक्षाने मंगळवारी मुख्य प्रवक्ता विजेते दहियाला पदावरून हटवले. दिल्लीतील आंदोलनादरम्यान पोलिसांकडून निदर्शकांवर लाठाचार्ज केला जात असताना दहिया एका फास्ट-फूड केंद्रात बर्गर खातानाचा व्हीडीओ व्हायरल झाला होता. या पृष्ठभूमीवर पक्षाने हा तडकाफडकी निर्णय घेतला आहे.

(वृत्तसंस्था)

# वांगचुक यांना मेदांतात हलवा

## दिल्ली उच्च न्यायालयाने दिली परवानगी

**नवी दिल्ली, २१ जुलै**

परीक्षेतील कथित अनियमिततेच्या मुद्द्यावरून २८ जूनपासून बेमुदत उपोषणावर असलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना येथील सफदरजंग रुग्णालयातून गुरुग्राममधील मेदान्ता रुग्णालयात त्वरित हलवण्याचा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी दिला.

केंद्रीय सरकारी रुग्णालयात सुरू असलेल्या उपचारांमध्ये हस्तक्षेप करण्यास उच्च न्यायालयाने रविवारी दिलेल्या आदेशाद्वारे नकार दिला होता. या आदेशाविरुद्ध वांगचुक यांची पत्नी गीतांजली आंगमो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्या. तेजस कारिया यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. न्यायालयाने मेदांता हॉस्पिटलच्या संचालकांना वांगचुकवर सतत देखरेख ठेवण्यासाठी आवश्यक तज्ज्ञ असलेल्या डॉक्टरांची एक टीम तयार करण्यास सांगितले.

डॉक्टर स्वीकारार्ह वैद्यकीय मानके आणि कार्यपद्धतीनुसार औषधोपचार करतील आणि याचिकाकर्त्याच्या पतीला त्याचे पालन करावे लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. वांगचुक यांना त्यांच्या पसंतीच्या म्हणजेच मेदान्ता रुग्णालयात हलवले जावे; यामुळे राज्यघटनेच्या कलम १९ आणि २१ अन्वये असलेल्या त्यांच्या मूलभूत अधिकारांची पूर्तता होईल. तसेच, आंगमो यांना हव्या त्या वेळी वांगचुक यांची भेट घेण्याची परवानगी दिली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. आम्हाला वांगचुक यांच्या मूलभूत अधिकारांशी देणेघेणे आहे. सध्या जे काही चालले आहे, त्याशी याचा काहीही संबंध नाही, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले. वांगचुक यांना हलवण्याबाबत सरकारला कोणताही आक्षेप नाही, असे तुषार मेहता यांनी स्पष्ट केले.

(वृत्तसंस्था)



ओडिशाच्या पुरी येथे मुसळधार पाऊस झाला. काही भाग जलमय झाला. मात्र, येथील रथयात्रा महोत्सवाच्या उत्साहात कोणताही फरक पडला नाही. साचलेल्या पाण्यातून जाताना येथील भाविक

## विलीनीकरणाला 'उबाठा'चे आव्हान

**नवी दिल्ली, २१ जुलै**

लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी उबाठा गटाच्या सहा खासदारांच्या गटाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत विलीनीकरण करण्याच्या दिलेल्या निर्णयाला आव्हान देत उबाठाने मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

उबाठा गटाच्या वतीने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ विधिज्ञ देवदत्त कामत यांनी सरन्यायाधीश सूर्य कांत प्रमुख आणि न्या. जॉयमाल्या बागची, न्या. विपुल एम.पांचोली यांच्या न्यायासनामोर ही याचिका दाखल केली. याचिकेवर बुधवारी सायंकाळी सुनावणी व्हावी, अशी मागणी कामत यांनी केली. त्यावर आम्ही निर्णय घेऊ, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले.

लोकसभेच्या सभापतींनी १८ जुलै रोजी उबाठाच्या सहा खासदारांना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत विलीनीकरणास मंजुरी दिली, असे कामत यांनी न्यायासनाला सांगितले. सभापतींनी विलीनीकरणाला मंजुरी दिली आहे. ही एक राष्ट्रीय घटना बनली आहे, असे कामत यांनी सांगितले.

(वृत्तसंस्था)

# 'एनडीआरएफ'साठी सदुंबरेत जमीन

## आपत्ती व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी तळ उभारणार | राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई, २१ जुलै**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाला (एनडीआरएफ) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील सदुंबरे येथील तीन हेक्टर जमीन विनामूल्य देण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

यापूर्वी सदुंबरे येथील गायरानातील तीन हेक्टर जमीन एनडीआरएफला बाजारभावाने देण्यास मंजुरी देण्यात आली होती. मात्र, एनडीआरएफने जनहित आणि राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेता ही जमीन विनामूल्य मिळावी, अशी विनंती राज्य शासनाकडे केली होती. एनडीआरएफ ही देशातील एकमेव समर्पित नागरी आपत्ती प्रतिसाद संस्था असून, ती आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने एनडीआरएफला ही जमीन 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून पूर्णपणे विनामूल्य हस्तांतरित करण्यास मान्यता दिली आहे.



या तीन हेक्टर जागेवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी सुसज्ज तळ उभारण्यात येणार आहे. या तळावर आपत्ती व्यवस्थापनाचे विविध प्रगत प्रशिक्षण दिले जाईल, तसेच विविध प्रकारच्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींवर तातडीने मात करण्यासाठी विशेष कृतीदले २४ तास तैनात राहतील. यामुळे पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत अधिक वेगाने आणि प्रभावीपणे मदत व बचाव कार्य करणे शक्य होणार आहे.

(तभा वृत्तसेवा)

# समान नागरी संहिता विधेयक मध्यप्रदेशात मंजूर

## मुख्यमंत्री यादव म्हणाले, वेगवेगळे धार्मिक मापदंड स्वीकारणार नाही

**भोपाळ, २१ जुलै**

मध्य प्रदेश विधानसभेत समान नागरी संहिता (यूसीसी) विधेयक मंजूर करण्यात आले. विरोधकांच्या गदारोळात मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी सरकारची भूमिका मांडली. ते म्हणाले, जे हिंदूंसाठी बोलतील तेच राज्य करतील. समानता आपल्या संस्कृतीचा पाया आहे. देवाच्या दृष्टीने सर्वजण समान आहेत. मग माणसाने बनवलेल्या कायद्यांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी का असाव्यात?, देशात सर्व नागरिकांसाठी समान कायदे असले पाहिजे, असेही ते म्हणाले.



मुख्यमंत्री यादव पुढे म्हणाले, रामापासून रहीमपर्यंत, रवींद्रापासून रॉबिनपर्यंत, अमरापासून अँथनी आणि अकबरापर्यंत, देशावर एकाच संविधानानुसार राज्यकारभार झाला पाहिजे. समान नागरी संहितेच्या अंमलबजावणीनंतर मध्य प्रदेश भेदभावापासून मुक्त होईल आणि गोवा, उत्तराखंड आणि आसामच्या पावलावर पाऊल ठेवून या दिशेने पाऊल उचलणाऱ्या निवडक राज्यांच्या गटात हे राज्य सामील होईल, असा विश्वास व्यक्त केला.

विरोधकांवर निशाणा साधत मुख्यमंत्री म्हणाले, या लोकांचे खाण्यासाठी वेगळे दात आहेत आणि दाखवण्यासाठी वेगळे दात आहेत. जनता त्यांना कधीही माफ करणार नाही. आम्ही आमच्या दोन मुलांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून का पाहतो, याचे स्पष्टीकरण विरोधकांनी द्यावे. त्यांच्या वक्तव्यादरम्यान विरोधी पक्षांनी विरोध सुरूच ठेवला. परंतु मुख्यमंत्र्यांनी सभागृहासमोर सरकारची भूमिका सविस्तरपणे मांडत मध्य प्रदेशात कोणताही वेगळा धार्मिक तराजू असणार नाही. सर्वांना समान वजनाने तोलले जाईल, असे स्पष्ट केले.

(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विशेष संपादकीय

# विकासाचा धुरंधर



एकोणविसाव्या शतकात राष्ट्रवादाची ओळख स्वातंत्र्याच्या लढ्याने ठरत होती. विसाव्या शतकात ती लोकशाही संस्थांच्या बळकटीवर ठरू लागली. एकविसाव्या शतकाने राष्ट्रवादाला नवा अर्थ दिला आहे. आता एखाद्या राष्ट्राचे सामर्थ्य त्याच्या लष्करी शक्तीइतकेच त्याच्या अर्थव्यवस्थेवर, पायाभूत सुविधांवर, संशोधनावर आणि नागरिकांच्या उत्पादक क्षमतेवर अवलंबून आहे. लष्करी शक्ती हा विषय सोडला तर इतर सारे राष्ट्रांएवढेच राज्यांना किंवा प्रांतांनाही लागू पडते. विकास हा आता केवळ अर्थकारणाचा विषय उरलेला नाही; तो राष्ट्रीय स्वाभिमानाचा विषय बनला आहे. भारताच्या विकासाकडे आपण सारे तसेच पाहतो. महाराष्ट्राच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्थान याच संदर्भात पाहावे लागते. कारण आज फडणवीसांचा जन्मदिवस आहे आणि त्यांना त्यानिमित्त शुभेच्छा देताना, या धुरंधर विकासपुरुषाच्या कर्तबगारीचे कौतुक करण्याचे निमित्त आहे.

विकास हा आपल्याकडे वापरून-वापरून पार बोथट झालेला शब्द. निवडणुकीत विकास असतो, अर्थसंकल्पात विकास असतो, सरकारी जाहिरातीत विकास असतो आणि प्रत्येक नेत्याच्या भाषणातही विकास असतोच. पण, विकास म्हणजे नेमके काय, हे अनेकांना कळत नाही. स्वातंत्र्यानंतर लोकतांत्रिक संस्था उभ्या करणे, संविधान रुजवणे, निवडणुका घेणे, न्यायव्यवस्था सक्षम करणे हे राष्ट्रनिर्मितीचे अर्थात विकासाचे टप्पे ठरले. आताचा काळ वेगळा आहे. जगातील राष्ट्रे किंवा राज्ये आता उत्पादन व निर्मितीच्या क्षमतेवर अर्थात अर्थकारणाच्या संदर्भात एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. कोण अधिक वेगाने निर्णय घेतो, कोण अधिक भांडवल आकर्षित करतो, कोण उत्पादकता व संशोधनाला चालना देतो, कोण उद्योगांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करतो या प्रश्नांची उत्तरेच त्या राष्ट्राचे किंवा राज्याचे स्थान ठरवतात. आधुनिक राष्ट्रवादाला विकासाचा तोंडवळा प्राप्त झाला आहे तो असा. फडणवीसांच्या कार्यशैलीत या स्थित्यंतराचे दर्शन घडते.

महाराष्ट्राला उद्योगांची, सहकाराची, शिक्षणाची व समाज सुधारणांची परंपरा आहे. तरीही गेल्या काही दशकांत राज्याने आपल्या नेतृत्वाच्या स्थानाबद्दल विशिष्ट गृहीतके स्वीकारली होती. आपण इतरांच्या पुढेच आहोत, त्यामुळे विशेष काही करण्याची गरज नाही, अशी आत्मसंतुष्ट मानसिकता नकळत तयार झाली होती. दरम्यान, इतर राज्यांनी वेग पकडला. गुंतवणुकीसाठी स्पर्धा सुरू झाली. शहरे बदलू लागली. जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले. अशा वेळी महाराष्ट्रालाही स्वतःचा विचार नव्याने करावा लागणार होता. फडणवीस यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र शासनाचे निर्णय या बदलत्या वास्तवातून जन्माला आलेले दिसतात आणि त्यामुळेच त्यांच्या निर्णयांचे दूरगामी परिणाम होताना आपण सारे पाहत आहोत. भविष्यातही त्यांच्या निर्णयांचे सकारात्मक परिणाम दिसणार आहेतच.

राजकारणात काही नेते परिस्थितीशी जुळवून घेतात; काही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करतात. पहिल्या प्रकारचे नेतृत्व व्यवस्थापन करीत काळ काढत असते. दुसऱ्या प्रकारचे नेतृत्व दिशा देते. देवेंद्र फडणवीस हे राज्याच्या व्यवस्थापनासह त्याला दिशा देणारे नेते आहेत. त्यांनी महाराष्ट्राला पुढील काही दशकांच्या चौकटीत पाहण्याचा प्रयत्न केला आणि तशी दिशा दिली आहे. महाराष्ट्राला त्यांनी घटक राज्याच्या पातळीवर न ठेवता जगाच्या स्पर्धेत उतरविले आहे. पायाभूत सुविधा म्हणजे सरकारी खर्च ही जुनी समजूत मोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. चांगली संपर्क व्यवस्था, आधुनिक शहरे, वेगवान सार्वजनिक वाहतूक, सक्षम लॉजिस्टिक्स, औद्योगिक कॉरिडॉर, डिजिटल पायाभूत रचना ही सर्व भविष्यातील संपत्ती-समृद्धी निर्माण करणारी साधने आहेत, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला. जगात ज्या समाजांनी पायाभूत सुविधांमध्ये धाडसी गुंतवणूक केली, तेच पुढे उद्योग, संशोधन आणि रोजगाराच्या क्षेत्रात आघाडीवर राहिले. महाराष्ट्राची त्याच दिशेने वाटचाल सुरू झाली यामागे फडणवीसांची दूरदृष्टी आहे. जगात जेव्हा-केव्हा भारताचा विचार होतो तेव्हा महाराष्ट्राचा होतोच, हे फडणवीसांच्या दूरदृष्टीचे यश आहे.

फडणवीस यांच्या विकासदृष्टीतील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे भौगोलिक वास्तवाकडे पाहण्याची त्यांची पद्धत. त्यांच्यासाठी विदर्भाचे मागासलेपण किंवा मराठवाड्याचा दुष्काळ ही मर्यादा नाही. राज्याचे विविध भाग विकसित होण्यासाठी प्रयत्न करू शकतात आणि त्यासाठी काय करायला हवे, हे फडणवीसांनी दाखवून दिले. योग्य संपर्क-समन्वय, सक्षम पायाभूत सुविधा आणि नियोजन यांच्या आधारे आर्थिक नकाशे बदलू शकतात, यावर त्यांचा विश्वास आहे. गडचिरोली जिल्ह्यात घडून येत असलेले मन्वंतर हे त्याचे ताजे उदाहरण. नक्षलवादामुळे त्रस्त असलेल्या जिल्ह्यात नक्षलवादाचा बीमोड होईल आणि विकासाचा रथ गतिमान होईल, याची कल्पनाही कुणी करत नव्हते. ते घडते आहे आणि त्यामागे देवेंद्रजींची दृष्टी आहे. त्यांचाच निर्धार आहे. देवेंद्रजींच्या कार्यपद्धतीचा आणखी एक गुण म्हणजे निर्णयक्षमता. विकासाचे प्रकल्प फक्त पैशांअभावी अडकत नाहीत; ते निर्णयांअभावी अडकतात. विलंब हा आपल्या प्रशासकीय संस्कृतीचा भाग आहे. शासन वेळेत निर्णय घेऊ शकत नाही, अशी भावना निर्माण झाली की गुंतवणूकदार सावध होतो, उद्योग मागे हटतात आणि नागरिकांचा विश्वास कमी होतो. मग विकास प्रकल्प रखडतात आणि आरोप-प्रत्यारोपांचे तेवढे पीक येते. अशा स्थितीत निर्णय प्रक्रियेला गती देणे हेही विकासाचेच एक रूप असते. फडणवीस यांच्या शैलीत हा आग्रह सातत्याने दिसतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते विषयांच्या तांत्रिक तपशिलांत शिरतात. आधुनिक काळात निव्वळ भाषणांवर राज्यकारभार करता येत नाही. अर्थव्यवस्था, शहरीकरण, जलव्यवस्थापन, ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा, पर्यावरण, जागतिक गुंतवणूक या सर्व क्षेत्रांतील बदल समजून घेणे नेतृत्वासाठी आवश्यक आहे. फडणवीस यांना अशा अनेक विषयांत गती आहे आणि नवे समजून घेण्यात त्यांना स्वारस्यही आहे. काही नेते सतत स्वतःच बोलतात. इतरांना बोलू देत नाहीत. आपल्याला काहीही समजून घेण्याची आवश्यकता नाही, अशी त्यांची वृत्ती बनते. गेली अनेक वर्षे महाराष्ट्राचे नेतृत्व करताना देवेंद्रजींनी विषय समजून घेण्याची सवय अंगी बाणवून घेतलेली आहे. त्यांच्या माघारी अनेक सनदी अधिकारी व उद्योगपती या कारणासाठी त्यांचे कौतुक करतात. त्यांचा उद्देश स्पष्ट असतो आणि तो म्हणजे काम दर्जेदार आणि वेगाने झाले पाहिजे. फडवीसांनी समृद्धी महामार्ग, अटल सेतू अशा अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या भविष्यात गुंतवणूक केली आहे. त्यांच्या विकासदृष्टीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी महाराष्ट्राला एक राज्य म्हणून नव्हे, तर जगातील स्पर्धक अर्थव्यवस्था म्हणून समोर आणले. त्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर ते स्वतः गेले. गुंतवणूक नेहमी स्पर्धात्मक राज्यांकडे जाते. त्यामुळे पायाभूत सुविधा, धोरणातील सातत्य, डिजिटल प्रशासन, जलद निर्णय आणि जागतिक दर्जाचे शहरीकरण ही त्यांच्या विकासदृष्टीची अपरिहार्य अंगे बनली. महाराष्ट्राबद्दल आकर्षण निर्माण झाले.

पूर्वीच्या काळात महाराष्ट्राचा विकास अजिबात झाला नाही, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरेल. मात्र, फडणवीसांच्या पहिल्या कार्यकाळात आणि सध्याच्या कार्यकाळात तो जसा झाला किंवा होतोय, त्याची तुलना भूतकाळाशी होऊ शकत नाही हेही तेवढेच खरे आहे. याचे कारण भविष्याचा वेध घेण्याच्या फडणवीसांच्या कार्यशैलीत दडलेले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत अनेक नेते सत्तेचे शिल्पकार झालेत. पण खऱ्या विकासाचे शिल्पकार म्हणून ओळख मिळविण्याची संधी फार थोड्यांना मिळाली. त्यातील अव्वल नंबरचे नाव म्हणजे देवेंद्र फडणवीस.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी सर्वाधिक काळ कार्यरत असलेल्या नेत्यांच्या यादीत त्यांचे नाव अलिकडेच आलेले आहे. तो विक्रम त्यांच्या नावे नोंदविला गेला आहे. पुढच्या काळातही अनेक विक्रम फडणवीसांच्या नावे नोंदविले जातील. कारण त्यांनी महाराष्ट्राला दिलेली दिशा आणि त्यासाठी केलेले काम. आपल्या काळाच्या मर्यादा ओलांडून पुढच्या काळासाठी काहीतरी टिकाऊ निर्माण करणाऱ्यांचीच इतिहास नोंद घेत असतो. फडणवीसांची तशी नोंद इतिहासात झालेली आहे आणि त्यामुळेच त्यांना 'विकासाचा धुरंधर' असे संबोधन देताना आमच्या मनात अतीव आनंद आहे. या धुरंधराला जन्मदिनाच्या अनंत कोटी शुभेच्छा! ■

## अभीष्टचिंतन

**नितीन गडकरी**

# देवेंद्रजी : महाराष्ट्राला लाभलेला अमूल्य ठेवा



महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा आज वाढदिवस. महाराष्ट्राची निरंतर सेवा करीत असलेल्या देवेंद्रजींना त्यानिमित्त खूप खूप शुभेच्छा. शालेय जीवनात अतिशय हुशार आणि कुशाग्र विद्यार्थी म्हणून देवेंद्रजींचा लौकिक होता. विधि महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. अनेक वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. लॉ कॉलेजमध्ये असताना विद्यार्थी संघाची निवडणूक लढवली. विद्यापीठ विद्यार्थी संघामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग होता. विद्यार्थिदशेत त्यांनी केलेली कामगिरी खरे तर भविष्यातील एका परिपक्व नेतृत्वाच्या जडणघडणीची प्रक्रियाच होती. त्याची प्रचीती साऱ्यांनाच आलेली आहे.

त्यांचे वडील स्व. गंगाधरराव फडणवीस जनसंघाच्या काळापासून पक्षाचे कार्यकर्ते होते. मी युवा मोर्चाचा अध्यक्ष असताना गंगाधरराव हे पदवीधर मतदारसंघाचे आमदार होते. त्यांनी नागपूर शहर, जिल्हा तसेच एकूणच विदर्भातील प्रश्नांना विधिमंडळात वाचा फोडली. एम्प्रेस मिलच्या कामगारांसाठी गंगाधरराव, ए. बी. बर्धन यांनी केलेल्या आंदोलनांचा मी साक्षीदार आहे. दुर्दैवाने त्यांना असाध्य आजार जडला आणि प्रकृती खालावू लागली. या पृष्ठभूमीवर देवेंद्रने आता राजकारणात यावे, असे आम्हाला वाटले आणि श्रद्धानंद पेठ वॉर्डातून त्यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला. मी आणि छोटूभय्या धाक्रस गंगाधररावांना भेटायला गेलो. सरिता वहिनीही तिथे होत्या. आमचा निर्णय आम्ही दोघांनाही सांगितला. गंगाधररावांनी अतिशय नम्रपणे सांगितले की, देवेंद्रने राजकारणात येण्यास माझी हरकत नाही. पण या गोष्टीचा निर्णय देवेंद्रने स्वतः घ्यावा. त्यांची ही भूमिका आजही मी पक्षाच्या सभा-बैठकांमध्ये मांडत असतो. अलिकडे मुलाला तिकीट मिळावे यासाठी आई-वडील आग्रह धरतात. पण देवेंद्र यांना राजकारणात आणून तिकीट द्यावे, अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांनी कधीही केली नाही. ती पक्षातील आमच्यासारख्या लोकांनी केली होती. हा आदर्श आज प्रत्येक कार्यकर्त्याने ठेवायला हवा.

महापालिकेच्या निवडणुकीत देवेंद्रजी निवडून आले. त्या काळात जनता युवा मोर्चाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांना मिळाली. नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या भाजपच्या अधिवेशनाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी देवेंद्रजींवर सोपवण्यात आली होती. देशभरातील कार्यकर्ते याठिकाणी आले होते. उत्तम आयोजनातून देवेंद्रजींनी सर्वांची मने जिंकली. त्यावेळी मी गंगाधररावांच्या जागेवर पदवीधर मतदारसंघाचा आमदार झालो होतो.

पुढे देवेंद्रजींनी पश्चिम नागपुरातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि ते आमदार झाले. मात्र, त्यांचा हा प्रवास एवढा सोपा नव्हता. अनेक आव्हाने होती. पुढच्या निवडणुकीत आम्ही सर्व्हेक्षण केले तेव्हा दक्षिण आणि पश्चिम नागपूरमधून उमेदवार जिंकणे अवघड असल्याचे लक्षात आले. मी देवेंद्रजींच्या कानावर टाकले. त्यांनी देशपांडे सभागृहात पश्चिम नागपूरच्या कार्यकर्त्यांचे संमेलन घेतले. जनतेच्या मनात विश्वास निर्माण केला आणि निवडणूक जिंकले. गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वात तरुण व उत्तम संसदपटू म्हणून स्वतःची छाप पाडली. विदर्भ, मराठवाड्याच्या मागासलेपणाचा प्रश्न असो की भ्रष्टाचाराची प्रकरणे असो, देवेंद्रजी आक्रमकपणे मुद्दे मांडत.

त्यावेळी विधानसभेत नारायण राणे तर परिषदेत मी विरोधी पक्षनेता होतो. राणे, मुंडे यांनी देवेंद्रजींना सातत्याने प्रोत्साहन दिले. विषय उपस्थित करून चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी देवेंद्रजींवर सोपवण्यात येत असे. संसदीय कर्तृत्व आणि वक्तृत्वाने त्यांनी सभागृह अक्षरशः गाजवले.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी राज्याला समृद्ध, संपन्न केले. शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या अनेक योजना आणल्या. मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक आणली. मी केंद्रात जलसंपदा खाते सांभाळत असताना देवेंद्रजींनी विदर्भातील बंद पडलेल्या सिंचन प्रकल्पांना पुनर्जीवन देण्यासाठी पुढाकार घेतला. गोसेखुर्दसारखे प्रकल्प मार्गी लावले. केवळ विदर्भातील नव्हे तर सोलापूर, सांगली, सातारा येथील योजना देखील पूर्ण केल्या. सिंचनाचा मोठा अनुशेष दूर झाला. देवेंद्रजी यांनी ज्या समस्यांसाठी विधानसभेत सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले होते, मुख्यमंत्री झाल्यावर त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी ठोस पावले उचलली, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरच्या विकासात देवेंद्रजींचे मोठे योगदान आहे. जिल्ह्यात नवे प्रकल्प आणण्यासाठी, उद्योगांत गुंतवणूक वाढविण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आणि आजही सुरू आहे. समृद्धी महामार्गाच्या उभारणीचे संपूर्ण श्रेय देवेंद्रजींचे आहे. नक्षल चळवळीमुळे गडचिरोलीचे आर्थिक आणि सामाजिक मागासलेपण वाढले होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच साडेसात लाख कोटींची गुंतवणूक गडचिरोलीत आली आणि नक्षल समस्येवर नियंत्रण आले. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र किंवा मुंबई-नागपूर असा भेद न करता संपूर्ण महाराष्ट्राचा त्यांनी चौफेर विकास केला. कर्करोगामुळे वडिलांचे निधन झाले. त्यामुळे कर्करोगाच्या रुग्णांची सेवा करण्यासाठी नागपुरात भव्य असे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट त्यांनी उभे केले. यातून देवेंद्र यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडते.

मनमिळावू, नम्र, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणून देवेंद्रजींकडे बघितले जाते. त्याचवेळी प्रशासनाच्या बाबतीत अत्यंत कठोर भूमिका घेऊन केवळ महाराष्ट्राच्या विकासाचे ध्येय डोळ्यापुढे ठेवणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यांच्यासारखा धडपड्या, कर्तबगार आणि निष्ठावान नेता हा महाराष्ट्रासाठी अमूल्य ठेवा आहे. त्यांचे भविष्यातील राजकीय आणि सामाजिक योगदान आणखी समृद्ध होवो, हीच त्यांच्या जन्मदिनानिमित्त शुभेच्छा. ■

(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार)

## प्रासंगिक

**चंद्रशेखर बावनकुळे**

# कर्तृत्व, संयमाची भावनिक गाथा!



जनमानसाचा अचूक वेध घेणारा अभ्यास, संकटाच्या छाताडावर पाय देऊन उभे राहण्याचे अफाट धैर्य, विरोधकांच्या धारदार टीकेला शांतपणे पण तितक्याच प्रभावीपणे परतवून लावण्याचा संयम आणि सहकाऱ्यांना सोबत घेऊन राज्याला प्रगतिपथावर नेण्याची दूरदृष्टी या सर्व गुणांचा समुच्चय म्हणजे देवेंद्रजी! सर्वार्थाने कर्तृत्व, प्रगती, सन्मान, संयमाची भावनिक गाथा म्हणजे देवेंद्रजींचे व्यक्तित्व.

भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, मंत्रिमंडळातील मंत्री आणि गेली साडेतीन दशकांचे आमचे मैत्र म्हणून मला देवेंद्रजींचे प्रगल्भ नेतृत्व अतिशय जवळून अनुभवता येत आहे. त्यांच्यासोबत काम करताना राजकीय परिपक्वता म्हणजे काय असते, याचे उत्तर पावलोपावली मिळते. हा मजकूर केवळ एका मुख्यमंत्र्यांच्या कामाचा ताळेबंद नाही, तर महाराष्ट्राला भरजरी उंचीवर नेणाऱ्या एका संयमी आणि द्रष्ट्या नेत्याच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध आहे.

देवेंद्रजींकडे सर्वांत मोठे अस्त्र आहे ते संयमाचे. सत्तेवर किंवा विरोधी पक्षात असतानाही व्यक्तीचा संयम सुटणे फार सहज असते. पण देवेंद्रजी याला अपवाद आहेत. मी त्यांना अनेक कठीण प्रसंगांत, अत्यंत तणावाच्या वातावरणात पाहिले आहे. जेव्हा संपूर्ण राज्य एखाद्या संवेदनशील मुद्यावरून ढवळून निघत असते, विरोधक चहूबाजूंनी हल्ले चढवत असतात, माध्यमे प्रश्नांची सरबत्ती करत असतात, अशा वेळीही देवेंद्रजींच्या चेहऱ्यावरील शांतता आणि कपाळावर आठी न पडता निर्णय घेण्याची त्यांची क्षमता अचूक असते. त्यांचा हा संयम केवळ वरवरचा नाही, तर तो त्यांच्या आंतरिक संस्कारातून आणि अभ्यासातून आलेला आहे. 'संयम' म्हणजे दुबळेपण किंवा कमजोरपणा नसून, ते सर्वांत मोठे सामर्थ्य आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. कितीही मोठा वाद असो, देवेंद्रजी कधीही आपली भाषा घसरू देत नाहीत. संसदीय मर्यादांचे पालन कसे करावे आणि वैचारिक मतभेद असतानाही समोरच्याचा आदर कसा ठेवावा, याचे ते उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या या संयमी वृत्तीमुळेच महाराष्ट्रातील अनेक बिकट प्रश्न अत्यंत शांततेत आणि सामोपचाराने सुटू शकले आहेत.

देवेंद्रजींचे नेतृत्व हे केवळ भाषणांपुरते मर्यादित नाही. ते अत्यंत 'डेटा-ड्रिव्हन' (माहितीवर आधारित) आणि अभ्यासू नेते आहेत. मंत्रालयातील फाईल्सचा अभ्यास असो, बजेटमधील तरतुदी असो वा एखाद्या क्लिष्ट कायद्याचा मसुदा, त्यातल्या तांत्रिक त्रुटी आणि सर्वसामान्यांच्या हिताच्या गोष्टी ते तत्काळ हेरतात. पकडतात. त्यांच्या नेतृत्वाची दुसरी जमेची बाजू म्हणजे त्यांची विलक्षण 'निर्णयक्षमता', अनिर्णायकतेच्या गर्तेत अडकलेल्या प्रशासनाला त्यांनी दमदार गती दिली. जलयुक्त शिवार योजना ही त्यांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी आहे. २५ वर्षांपूर्वी पाहिलेले नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात आणले. मुंबईतील मेट्रोचे जाळे, तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून नावीन्यपूर्ण उद्योगनिर्मिती किंवा सद्य महसूल विभागातील ऐतिहासिक सुधारणा ही त्यांच्याच निर्णयक्षमतेची राज्याला मिळणारी फळे आहेत. प्रशासनावर पकड कशी असावी आणि लोककल्याणकारी योजना कशी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवावी, याचे अचूक कसब त्यांच्याकडे आहे. गतिमान प्रशासन हा त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच महाराष्ट्रात रूढ झालेला शब्द आहे.

मंत्रिमंडळातील सहकारी म्हणून काम करताना मला नेहमीच जाणवले की, देवेंद्रजी हे केवळ आमचे नेते नाहीत, तर ते मार्गदर्शक आणि पाठीशी खंबीरपणे उभा असलेला 'कणा' आहेत. अनेकदा प्रशासकीय निर्णय घेताना किंवा जनतेचे प्रश्न सोडवताना आमच्यासमोर पेचप्रसंग निर्माण होतात. अशावेळी मुख्यमंत्र्यांच्या दालनात गेल्यावर कधीही निराशा पदरी पडत नाही. ते सहकाऱ्यांचे ऐकून घेतात, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देतात आणि जर काम जनहिताचे असेल तर संपूर्ण ताकदीनिशी त्या सहकाऱ्याच्या मागे उभे राहतात. जर एखादी चूक झाली, तर ती चार भिंतींच्या आड समजावून सांगतात, पण जाहीरपणे कधीही आपल्या सहकाऱ्याला कमी लेखत नाहीत. त्यांच्या या विश्वासू आणि आश्वासक स्वभावामुळेच संपूर्ण मंत्रिमंडळ एका टीमसारखे काम करते. माझे निरीक्षण आहे, ते कधीही 'बॉस' बनून हुकूम सोडत नाहीत, तर 'लीडर' बनून सोबत चालतात.

भारतीय जनता पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून देवेंद्रजींसोबत काम करण्याचा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा आहे. विलक्षण आहे. निर्णय आणि त्यांची मुद्देसूद अंमलबजावणी यामुळेच भाजपची महाराष्ट्रातील वाढ आणि देवेंद्रजींचे नेतृत्व हे समीकरण एकरूप झाले आहे. पक्षाला कठीण स्थितीतून बाहेर काढणे, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य फुंकणे आणि विचारधारा सर्वसमावेशक पद्धतीने जनतेसमोर मांडणे, यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. कोण कार्यकर्ता काय काम करतो आहे, याची माहिती त्यांच्याकडे असते. त्यांच्यासोबत काम करताना कार्यकर्त्याला कायम वाटते, देवेंद्रजी आहेत. सारे नीट होईल. त्यांची साधी राहणी, कार्यकर्त्यांशी असलेले थेट संभाषण आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात धावून जाण्याची प्रवृत्ती यामुळे ते तळागाळातील कार्यकर्त्यांचे देवाभाऊ बनले आहेत.

निवडणुकीचे मैदान असो की रणनीती, देवेंद्रजींचा राजकीय चाणाक्षपणा आणि पक्षाप्रति असलेली निष्ठा कार्यकर्त्यांना ऊर्जा देणारी ठरते. त्यांनी पक्षाला केवळ सत्ता मिळवून दिली नाही, तर सुशासनाचा एक नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. वरवर अत्यंत कणखर आणि प्रशासकीय वाटणाऱ्या देवेंद्रजींच्या आत एक अत्यंत संवेदनशील मन दडलेले आहे. महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी व ग्रामीण भागातील जनता यांच्याविषयी त्यांच्या मनात प्रचंड कळवळा आहे. जेव्हा महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट होते, तेव्हा मंत्रालयात बसून राहण्याऐवजी स्वतः पायपीट करून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अश्रू पुसण्याचे काम करतात. आधार देतात. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून हजारो गावे पाण्यासाठी स्वयंपूर्ण करताना त्यांच्या डोळ्यांत जे समाधान होते, ते खऱ्या लोकनेत्याचे होते. मुख्यमंत्री साहाय्यता निधीच्या माध्यमातून लाखो गरीब रुग्णांना मोफत उपचार मिळवून देणे, हा त्यांच्या संवेदनशीलतेचा मोठा पुरावा आहे.

आज महाराष्ट्र प्रगतीच्या एका अशा टप्प्यावर उभा आहे, जिथे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागाचा विकास या दोन्हीचा समतोल साधणे गरजेचे आहे. हा समतोल कसा साधावा, याचे अचूक व्हिजन देवेंद्रजींकडे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा हा नेता आहे.

यंदाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांनी घेतलेले निर्णय राज्यातील सामान्य जनतेच्या प्रगतीची आणि सन्मानाची एक भावनिक गाथा आहे. त्यांनी राज्याच्या विकासाचा नवा अध्याय लिहिला. लोककल्याणकारी राज्याची वास्तववादी संकल्पना त्यांनी साकार केली. दिलेला शब्द पाळला आहे. या अधिवेशनात त्यांनी कृषी संस्कृतीच्या काळजाला हात घालणारा अत्यंत भावुक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला. शतकानुशतके शेतात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून अहोरात्र राबणाऱ्या, पण हक्काच्या सात-बारापासून आणि कायदेशीर ओळखीपासून वंचित राहिलेल्या माता-भगिनींना त्यांनी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' च्या माध्यमातून 'स्वतंत्र शेतकरी' म्हणून अधिकृत कायदेशीर दर्जा दिला. जमिनीची मालकी नसतानाही केवळ महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या बळावर त्यांना बँक कर्जे आणि सरकारी योजनांचा थेट लाभ मिळवून देण्याचा हा निर्णय म्हणजे राज्यातील शेतकरी महिलांच्या श्रमाचा केलेला सर्वोच्च सन्मान आहे. याशिवाय, महिला शेतकऱ्यांच्या आर्थिक बळासाठी स्वतंत्र निधी आणि डिजिटल डेटाबेसची केलेली तरतूद महिलांच्या सक्षमीकरणाला नवी दिशा देणारी ठरली.

दुसरीकडे, अस्मानी संकटांनी खचलेल्या बळीराजाच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी त्यांनी राज्यातील ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आणण्यासाठी तब्बल ३६,५८५ कोटी रुपयांची ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली. केवळ घोषणा न करता अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी २०,५५२ कोटी रुपयांची तत्काळ तरतूद करून आपल्या शब्दाला कृतीची जोड दिली. राज्यातील ७.५ हॉर्सपॉवरपर्यंतचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांची तब्बल ४८,००० कोटी रुपयांची जुनी थकित वीज बिले पूर्णपणे माफ करण्याची घोषणा केली. शेतीकामांसाठी लागणारे गौणखनिज पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्याचा आणि कमी पावसाच्या सावटाखाली असलेल्या बळीराजाला बियाणे व खतांचा साठा वेळेत पोहोचवण्याचा त्यांचा निर्णय शेतकऱ्यांप्रति असलेली त्यांची तीव्र आत्मीयता आणि कौटुंबिक जिव्हाळा स्पष्ट करतो.

देवेंद्रजींच्या मार्गदर्शनामुळे महसूल विभागाने 'राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना' जाहीर केली आहे. राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना आळा घालणे या त्रिसूत्रीवर आधारित हा निर्णय आहे. या योजनेंतर्गत राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांचे बचत गट आणि 'उमेद/माविम' अंतर्गत येणाऱ्या ग्रामसंघांना नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत. आम्ही एकाच वेळी महिला बचत गटांना रोजगाराची मोठी संधी देत आहोत आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना कायमचा अटकाव करत आहोत. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा भगिनींच्या बचत गटांना यामध्ये विशेष प्राधान्य दिले जाईल.

केवळ शेतशिवारच नव्हे, तर राज्याचा कणा असलेल्या गृह आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही त्यांच्यातील द्रष्ट्या नेतृत्वाचे दर्शन घडले. कामाच्या ठिकाणी आणि कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, त्यांनी महिला आमदारांची संयुक्त वैधानिक समिती स्थापन केली; तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या मानसिक व लैंगिक छळाच्या तक्रारींवर एसआयटीमार्फत कठोर कारवाई करत नऊ गुन्हे दाखल करून भगिनींच्या पाठीशी राज्याची संपूर्ण शक्ती उभी केली. स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणून राज्यातील तरुणांचे भवितव्य सुरक्षित करणे, हे सर्व निर्णय देवेंद्रजींच्या अष्टपैलू, कणखर आणि तितक्याच सहृदयी नेतृत्वाची साक्ष देतात. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळताना त्यांनी ज्या पद्धतीचे राजकारण केले, त्याने महाराष्ट्राची मान देशात उंचावली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हाच अजोड गुण आहे की, मित्र असो वा विरोधक, त्यांच्या कर्तृत्वाची आणि संयमाची दखल प्रत्येकालाच घ्यावी लागते.

माझे भाग्य आहे की, मला त्यांच्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून राज्याची सेवा करण्याची आणि त्यांच्यासारख्या उत्तुंग नेत्याच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. देवेंद्रजींचे नेतृत्व महाराष्ट्राला दीर्घकाळ मार्गदर्शक ठरत राहील आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली आमचा महाराष्ट्र देशात अव्वल स्थानावर कायम राहील, हा आम्हा सर्व सहकाऱ्यांचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा ठाम विश्वास आहे. त्यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा! ■

(महसूल मंत्री, महाराष्ट्र)

(शब्दांकन : रघुनाथ पांडे, माध्यम सल्लागार)

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मनलच्या १५०, कुशाग्रच्या १११ धावा

## भारताचा ४११ धावांचा डोंगर, श्रीलंकेचा डाव कोसळला


मनल चौहान

**कोलंबो, २१ जुलै**

गॉल येथे १९ वर्षांखालील भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताने सर्वबाद ४११ धावा केल्या. कुशाग्र ओझाने पहिल्या दिवशी शतक झळकावले होते आणि दुसऱ्या दिवशी १११ धावा करून तो बाद झाला. त्याच्या पाठोपाठ मनल चौहाननेही शतक झळकावत १५० धावा केल्या. भारत मजबूत स्थितीत आहे. खेळ थांबला तेव्हा श्रीलंकेच्या ८ बाद १२२ धावा होत्या.

चहापानाच्या वेळेपर्यंत श्रीलंकेचे दोन्ही सलामीवीर बाद झाले होते. श्रीलंकेने १० षटकांत २ गडी गमावून ४३ धावा केल्या होत्या. भारतासाठी काव्या पटेल आणि प्रणव राघवेंद्र यांनी सुरुवातीचे बळी घेतले. श्रीलंकेकडून गिमान मेंडिसने तीन बळी घेतले, तर डलनिथ सिगेरा, सेथमिका सेनेविरत्ने आणि विग्नेश्वरन आकाश यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताने ३ गडी गमावून २५३ धावा केल्या होत्या. दुसऱ्या दिवशी भारताने आपल्या धावसंख्येत १५८ धावांची भर घातली त्यात ७ गडी बाद झाले. कुशाग्र आणि मनल यांनी चौथ्या गड्यासाठी १५५ धावा जोडल्या. त्यानंतर त्यांनी पाचव्या गड्यासाठी ४९ धावा जोडल्या, पण आर्यन सकपा केवळ १० धावांचे योगदान देऊ शकला.

अखेरीस, चिगुरुपती व्यंकटने २५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी करून भारताला ४०० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. दुसऱ्या दिवशी भारताला केवळ ४०.२ षटके खेळता आली. खालच्या फळीतील फलंदाज महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकले नाहीत. भारताचे शेवटचे तीन फलंदाज केवळ ८ धावांत बाद झाले. श्रीलंकेच्या १९ वर्षांखालील संघाकडून सलामीवीर दिमंथा महाविथानाने २४ आणि अविशा समशने ९ धावा केल्या. या सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार विमथ दिनासारा याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. त्यांनी दोन्ही सलामीवीरांना अवघ्या ० धावांवर गमावले. मागील सामन्यात द्विशतक झळकावणारा लक्ष्य रायचंदानी आणि शतक झळकावणारा सागर विर्क यांनाही आपले खाते उघडता आले नाही. त्यानंतर कर्णधार यशवर्धन चौहानने कुशाग्र ओझासोबत तिसऱ्या गड्यासाठी १२२ धावा जोडल्या. यशने ७८ धावा केल्या.

भारताकडून प्रणव राघवेंद्रने २८ धावांत २, काव्य पटेलने ३४ धावांत १, चिगुरपती वेंकटने २३ धावांत २, जगन्नाथन हेमचुदेशनने २९ धावांत १ आणि रोहित यादवने ४ धावांत २ गडी बाद केले. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### स्क्वॅश : भारतीयांची चांगली सुरुवात

**नवी दिल्ली :** कॅनडातील ओंटारियो येथे सुरू असलेल्या जागतिक ज्युनियर स्क्वॅश चॅम्पियनशिपमध्ये, अव्वल मानांकित भारतीय खेळाडू अनाहत सिंगने न्यूझीलंडच्या पात्रता फेरीतील खेळाडू लिली विल्सनचा ११-२, ११-१, ११-३ असा सहज पराभव करून महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. सोमवारी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, आर्यवीर दिवाण, युशा नफीस आणि गुरवीर सिंग या भारतीय त्रिकुटाने पुरुष एकेरीच्या तिसर्या फेरीत प्रवेश केला. पूर्व रामभियाने रॉनी हिकलिंगविरुद्ध जोरदार आव्हान उभे केले, परंतु अखेरीस हा भारतीय खेळाडू पाच गेमच्या रोमांचक सामन्यात पराभूत झाला. महिलांच्या पहिल्या फेरीत, अनिका दुबेने जपानच्या ना कुवाहराचा सरळ गेममध्ये पराभव केला, तर सान्वीने नेदरलँड्सच्या एल्के मोल्सचा पाच गेमच्या लढतीत पराभव केला. ■

# विश्वचषकासाठी भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा

## हरमनप्रीत सिंगकडे कर्णधारपदाची धुरा



**नवी दिल्ली, २१ जुलै**

भारताने पुढील महिन्यात होणाऱ्या एफआयएच पुरुष हॉकी विश्वचषकासाठी २० सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. प्रो लीगच्या युरोपियन टप्प्यात खेळलेल्या काही खेळाडूंना संघातून वगळण्यात आले आहे. प्रो लीगसाठी २४ सदस्यीय संघाची निवड करण्यात आली होती, परंतु विश्वचषकासाठी केवळ २० खेळाडूंची निवड केली जाईल. बचावपटू अमनदीप लाक्रा, मिडफिल्डर राजकुमार पाल आणि रविचंद्र सिंग मोइरांगथम, आणि फॉरवर्ड सेल्वम कार्ती यांचा संघात समावेश करण्यात आलेला नाही.

गेल्या महिन्यात झालेल्या प्रो लीगच्या युरोपियन टप्प्यानंतर, भारताने चार विजय, पाच बरोबरी आणि सात पराभवांसह नऊ संघांपैकी पाकिस्तानच्या वर, आठवे स्थान मिळवले. आठ वेळा ऑलिम्पिक विजेता असलेल्या भारतीय संघाने १९७५ मध्ये एकदाच विश्वचषक जिंकला आहे. यजमान भारताने शेवटचा विश्वचषक २०२३ मध्ये भुवनेश्वर येथे जिंकला होता, त्यावेळी भारताने नववे स्थान मिळवले होते. भारताने १९७१ मध्ये बार्सिलोना येथे कांस्यपदक आणि १९७३ मध्ये अॅमस्टरडॅम येथे रौप्यपदक जिंकले होते.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला सलग दुसरे कांस्यपदक मिळवून देणारा हरमनप्रीत सिंग संघाचा कर्णधार असेल. २०२० टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताची ४१ वर्षांची कांस्यपदकाची प्रतीक्षा संपवणारा मनप्रीत सिंग मिडफिल्डचा कणा असेल. मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले, हा एक संतुलित संघ आहे, ज्यात युवा आणि अनुभवी खेळाडूंचा मिलाफ आहे. खेळाडूंची निवड त्यांच्या कामगिरीच्या आधारावर करण्यात आली आहे.

भारताला इंग्लंड, पाकिस्तान आणि वेल्ससोबत पूल डी मध्ये स्थान देण्यात आले आहे. भारताचे सर्व पूल सामने नेदरलँड्समधील अॅमस्टेलवीन येथे खेळले जातील. हॉकी इंडियाने जारी केलेल्या प्रसिद्धी पत्रकात फुल्टन म्हणाले, आक्रमण, प्रतिआक्रमण आणि कामगिरी हा संघाच्या तयारीचा पाया आहे आणि आम्ही त्यावर लक्ष केंद्रित करतो. आम्ही प्रत्येक सामन्यानुसार आमची रणनीती विकसित करू.

◂ (वृत्तसंस्था)

### भारतीय संघ

गोलरक्षक : मोहित एचएस, सूरज करकेरा, बचावपटू : जरमनप्रीत सिंग, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), अमित रोहिदास, जुगराज सिंग, संजय, सुमित, यशदीप सिवाच, मधली फळी : राजिंदर सिंग, आदित्य अर्जुन लालगे, हार्दिक सिंग, मनप्रीत सिंग, नीलाकांत शर्मा आणि विवेक सागर प्रसाद, आक्रमणपटू : दिलप्रीत सिंग, शीलानंद लाक्रा, सुखजीत सिंग, मनदीप सिंग आणि अभिषेक. ■

### भारतीय संघाचे सामने

**भारत १५ ऑगस्ट रोजी वेल्स, १७ ऑगस्ट रोजी इंग्लंड आणि १९ ऑगस्ट रोजी पाकिस्तानविरुद्ध खेळेल. फुल्टन म्हणाले, भारताने १९७५ पासून विश्वचषक जिंकलेला नाही आणि या संघात भारतीय हॉकीच्या इतिहासात एक नवीन अध्याय लिहिण्याची क्षमता आहे.** ■

# लिओनेल मेस्सीशिवाय अर्जेंटिना संघ मायदेशी

### पराभव होऊनही भव्य स्वागत

**ब्यूनस आयर्स, २१ जुलै**

न्यू यॉर्कच्या मेटलाईक स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात स्पेनकडून ०-१ असा पराभव झाल्यानंतर, अर्जेंटिना संघ मायदेशी परतला आणि विमानतळावर त्यांचे लाल गालिचा व लष्करी बँडसह जोरदार स्वागत करण्यात आले. संघाला विजेतेपद राखण्यात अपयश आले असले तरी, चाहत्यांनी आपला पाठिंबा दर्शवला. इझेझा येथील मिनिस्ट्रो पिस्तारिनी आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील अर्जेंटाइन फुटबॉल असोसिएशनच्या कार्यालयाबाहेर हजारो लोक जमले होते.

विमान उतरल्यानंतर, प्रतिनिधी मंडळाच्या येण्या-जाण्याची सोय व्हावी म्हणून विमान खाजगी उड्डाण क्षेत्रात हलवण्यात आले.

प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी आणि संघातील इतर सदस्यांचे ग्रेनेडियर रेजिमेंटने लाल गालिचा अंथरूण आणि 'मुचाचोस' हे गाणे वाजवून धावपट्टीवर स्वागत केले, त्यानंतर मोठ्या संख्येने चाहत्यांनी मैदानाला वेढा घातला. चाहत्यांनी पांढऱ्या आणि निळ्या रंगाच्या छत्र्या घेतल्या होत्या आणि संघाचा कर्णधार लिओनेल मेस्सीची १० क्रमांकाची जर्सी परिधान केली होती. तथापि, ३९ वर्षीय मेस्सी संघासोबत उपस्थित नव्हता. एएफएने आधीच जाहीर केले होते की संघातील अनेक सदस्य प्रवास करणार नाहीत आणि मेस्सी त्यापैकी एक होता. ◂ (वृत्तसंस्था)


न्यू यॉर्कजवळील ईस्ट रदरफोर्ड (न्यू जर्सी) येथे झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा पराभव केल्यानंतर, सोमवारी माद्रिदच्या सिबेलेस चौकात स्पेनच्या राष्ट्रीय फुटबॉल संघातील खेळाडूंनी आनंद व्यक्त केला.

# क्रीडा प्रमाणपत्रे तात्काळ डाउनलोड करा

### जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचे सोलापूर जिल्ह्यातील शाळा- महाविद्यालयांना निर्देश

**सोलापूर, दि. २१ जुलै -**

सोलापूर महानगरपालिका व सोलापूर जिल्हा क्षेत्रातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील खेळाडू विद्यार्थ्यांची क्रीडा प्रमाणपत्रे तात्काळ डाउनलोड करून घेण्याचे निर्देश जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी दिले आहेत.

जिल्हा क्रीडा कार्यालयाची जुनी वेबसाईट [https://dsosolapur.com](https://dsosolapur.com) ही बंद राहणार आहे. त्यामुळे सन २०२५-२६ या वर्षातील क्रीडा प्रमाणपत्रे डाऊनलोड करण्यासाठी clicksportsindia.com ही नवीन वेबसाईट उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही वेबसाईट केवळ २५ जुलै २०२६ पर्यंतच सुरु राहणार आहे.

दिलेल्या मुदतीनंतर या वेबसाईटवर प्रमाणपत्रे उपलब्ध होणार नाहीत. ज्या शाळांचे किंवा विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र डाऊनलोड करायचे राहिले असल्यास त्यांनी २५ जुलैपूर्वी ते डाऊनलोड करून घ्यावे. ठरवून दिलेल्या कालावधीत प्रमाणपत्रे डाऊनलोड न केल्यास आणि खेळाडूंचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची राहील, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

### नवीन प्रवेशिकेसाठी नवीन वेबसाईट

सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या प्रवेशिका जुन्या किंवा या वेबसाईटवर भरू नयेत. शासनाकडून लवकरच नवीन वेबसाईटची माहिती उपलब्ध करून दिली जाईल. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व प्राचार्य व मुख्याध्यापकांनी याची त्वरित नोंद घेऊन कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी केले आहे.

# व्हीलचेअर बास्केटबॉलमध्ये भारताची ऐतिहासिक पदकावर नजर

### ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

**नवी दिल्ली, २१ जुलै**

अदम्य धैर्य आणि चिकाटीचे उदाहरण देणाऱ्या दोन भारतीय महिला खेळाडू, ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी व्हीलचेअर बास्केटबॉलमध्ये पदक जिंकून इतिहास रचण्याच्या तयारीत आहेत. ही एक अशी कामगिरी आहे जी यापूर्वी कोणत्याही भारतीयाने केलेली नाही. महाराष्ट्राची मीनाक्षी जाधव झाडावरून पडल्याने पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झाली होती, तर मणिपूरच्या रितू चानूचा लहानपणी झालेल्या बस अपघातानंतर गुडघ्याच्या वरचा उजवा पाय कापण्यात आला होता. संघातील इतर दोन सदस्य महाराष्ट्राची रीना गुप्ता आणि कर्नाटकाची लक्ष्मी रायण्णवर आहेत.


मीनाक्षी जाधव

व्हीलचेअर बास्केटबॉल या प्रकाराची सुरुवात २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत झाली. या प्रकारात, एका वेळी तीन खेळाडू कोर्टवर खेळतात आणि एक खेळाडू बदली खेळाडू म्हणून उपलब्ध असतो. हा सामना १० मिनिटांचा असतो. थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय व्हीलचेअर बास्केटबॉल फेडरेशन आशिया-ओशनिया चॅम्पियनशिपच्या माध्यमातून भारतीय संघाने २०२५ च्या राष्ट्रकुल खेळांसाठी पात्रता मिळवली. संघाची कर्णधार मीनाक्षीने तिच्या संघर्षाची कहाणी सांगताना म्हटले, मी महाराष्ट्रातील एका गावात सामान्य जीवन जगत होते. २०१२ मध्ये, मी २३ वर्षांची असताना, झाडावरून पडले आणि माझ्या पाठीच्या कण्याला गंभीर दुखापत झाली. ◂ (वृत्तसंस्था)

### गुकेशचा सलग दुसरा पराभव, सरिनने एरिगसीला हरवले

**चेन्नई :** भारतातील सर्वात प्रतिष्ठित क्लासिकल स्पर्धा असलेल्या 'क्वांटबॉक्स चेन्नई ग्रँड मास्टर्स २०२६' च्या चौथ्या आवृत्तीच्या उपांत्य फेरीत, जीएम एम प्रणेशने विश्वविजेता डी. गुकेशला सलग दुसऱ्यांदा पराभूत केले, तर जीएम निहाल सरिनने आपल्याच देशाच्या अर्जुन एरिगसीला पराभूत केले.

एरिगसीच्या पराभवामुळे, सहाव्या फेरीतील सामना जीएम नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हविरुद्ध बरोबरीत सोडवणारा फ्रेंच जीएम अलीरेझा फिरौजा ४ गुणांसह एकमेव अव्वल स्थानी कायम आहे. एरिगसी आणि अब्दुसत्तोरोव्ह प्रत्येकी ३.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर बरोबरीत आहेत. ■

# कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या वैष्णवी खटावकर हिची 'मिशन लक्षवेध'साठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जुलै-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथील तृतीय वर्ष मेकॅनिकल अभियांत्रिकीची विद्यार्थिनी वैष्णवी अनिल खटावकर हिची २०२५-२६ मधील इंडिया टीम ट्रायलच्या गुणांवर आधारित महाराष्ट्र राज्य शासनाच्या खेळाडूच्या उन्नतीसाठी असलेला उपक्रम मिशन लक्षवेधसाठी बालेवाडी पुणे येथे निवड झाली आहे.

यामध्ये भविष्यात होणाऱ्या नॅशनल, इंटरनॅशनल, ऑलिंपिक स्तरावरील प्रशिक्षण दिले जाणार आहे. पिलीव या ग्रामीण भागात राहणाऱ्या खटावकर हिने पाच वर्ष तायक्कांदोचे प्रशिक्षण पूर्ण केले असून राज्य स्तरावरील अनेक सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. तसेच रायफल व पिस्तोल शूटिंग मध्येही १४ वर्षापासून विद्यापीठ, राज्य व देश पातळीवर वेगवेगळ्या सामन्यांमध्ये तिने उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. वैष्णवी हिने स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया या संस्थेत प्रशिक्षण पूर्ण करून मे २०२६ मध्ये तिला शूटिंग कोच ही पदवी प्रदान करण्यात आली आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस पी पाटील, डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार जी.डी. वाळके,उपप्राचार्य प्रा. जगदीश मुडेगावकर, विभाग प्रमुख डॉ. ए. टी. बाबर, डॉ. एस. व्ही. एकलारकर, डॉ. एस. एम. लंबे, प्रा दीपक भोसले, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. राहुल पांचाळ, प्रा अभिनंदन देशमाने, प्रा.गणेश बागल तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी वैष्णवी हिचे अभिनंदन केले.

# समर्थ क्रिकेट क्लबला विजेतेपद

### 'देवा भाऊ चषक' क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**

समर्थ क्रिकेट क्लबने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या 'देवा भाऊ चषक' क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

नेहरूनगर शासकीय मैदानावर झालेल्या या स्पर्धेत बापू क्रिकेट क्लब शेळगी संघाने उपविजेतेपद मिळिवले. स्पर्धेतील उत्कृष्ट काम गिरीबद्दल सईद जागिरदारला मालिकावीर, संदीप पवार यास उत्कृष्ट फलंदाज तर मयूर राठोडला उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक राजशेखर पाटील, नगरसेवक दीपक जमादार आणि संतोष अण्णा पाटील यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरण समारंभ भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष रोहिणीताई तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका संगिताताई जाधव, नगरसेविका अश्विनीताई चव्हाण, मंडळ अध्यक्ष महेशजी देवकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी स्पर्धेचे आयोजक परमेश्वर माळगे, विजय कोणापुर, गोरक चौधरी, शिवराज बिराजदार, आप्पा रामदाशी, काशिनाथ औरसंग, राज कामशेट्टी, धनराज पाटील, श्रीकात पाटील, लक्ष्मण कावळे, विष्णु पाटील, सजाद जिल्ला, साईद सय्यद, श्रीशैल कुताटे, धर्मराज नाशी, शंकर पवार, मनीष काळे, प्रतिक सोनवणे, श्रीकात भोसले, गणेश जाधव, यश दिडोरे, अनिल गायकवाड, सप्निल ईगळे, शुभम टंकाळे, रितेश किलजे नागेश किलजे तसेच परिसरातील अनेक मान्यवर, खेळाडू आणि नागरिक उपस्थित होते.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# मल्लिकार्जुन नगर येथील चार सराईत गुन्हेगार सोलापूर जिल्ह्यातून २ वर्षाकरीता तडीपार






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जुलै-**
गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेले मल्लिकार्जुन नगर येथील चार सराईत गुन्हेगारांना सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आले आहे.वेंकप्पा उर्फ महेश भोजप्पा रद्दडगी (वय-२१ वर्षे, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर (टोळी प्रमुख), नितीन किसन पवार (वय-२२ वर्षे, रा. सदर ), विजय उर्फ प्रेम मनोज खुणे ( वय-२१ वर्षे, रा. सदर ) आणि आकाश भोजप्पा रद्दडगी ( वय-२४ वर्षे, रा. सदर ) अशी तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत. या गुन्हेगारांविरुद्ध सन २०२३, २०२४, २०२५ व २०२६ या कालावधीमध्ये टोळीच्या माध्यमातून आपखुशीने दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा करणे, महिला अत्याचाराचे गुन्हे करणे, घातक शस्त्र जवळ बाळगून दहशत निर्माण करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्यांचेविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ)प्रितम यावलकर, यांनी कार्यवाही करुन दि.२० जुलै २०२६ रोजी त्या चौघा जणांना सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.




# गोल रिंगण, धावा आणि भारूडांनी वेळापुरात रंगला विठ्ठल भक्तीचा सोहळा

## आज संतांच्या पालख्यांचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश

**तभा वृत्तसेवा । ओंकार आडत**
**वेळापूर, दि. २१ जुलै-**
पानीव पाटीच्या शिवारात रंगलेले गोल रिंगण, विठ्ठल भेटीसाठी केलेला धावा व लोकरंजनातून भक्तीमार्ग सोपा करणारे भारूड असे विविध रंग उधळीत आषाढी वारीने पंढरीकडे निघालेला विठ्ठल भक्तीचा आनंद मेळा शनिवारी श्री अर्धनारी नटेश्वर व प.पू. डॉ. भाईनाथ महाराज कारखानीस यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यपावन वेळापूर नगरीत विसावला. उद्या (बुधवार) सोहळ्यातील तिसरे गोल रिंगण ठाकूरबुवा येथे झाल्यानंतर सोहळा टप्पा येथे पंढरपूर तालुक्यात प्रवेश करेल.

वेळापूर येथे पुरातन हेमाडपंथी श्री अर्धनारी नटेश्वराचे मंदिर आहे. हे एक जागृत देवस्थान असून शिव-पार्वतीची सुंदर अलंकारांनी सजलेली मूर्ती असल्याने देशभरातून येथे हजारो पर्यटक येतात. माळशिरस तालुक्यात खोदकाम करताना सापडलेल्या सुंदर मूर्ती येथे आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने येथे मूर्ती संग्रहालय उभारले आहे. नाथ संप्रदायातील महान योगी प.पू. डॉ. भाईनाथ महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही नगरी आहे. येथील श्रीधर कुटीमध्ये त्यांची समाधी आहे. महाराष्ट्रातून हजारो साधक शिव-पार्वती व भाईनाथ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी येथे येतात.

दरम्यान, सकाळी माळशिरसहून मार्गस्थ झालेला पालखी सोहळा दुसऱ्या गोल रिंगणासाठी पानीव पाटी येथे पोहोचला. ढगाळ वातावरणात



परंपरेप्रमाणे रिंगणाला सुरुवात झाली. सकाळी माऊलींचा अश्व रिंगणासाठी सोडण्यात आला. दोन्ही अश्वांनी नेत्रदीपक चार प्रदक्षिणा पूर्ण करून लाखो भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. ''माऊली... माऊली...'' नामाचा जयघोष करीत रिंगण सोहळा संपन्न झाला. त्यानंतर वारकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीचे खेळ खेळले. झिम्मा, फुगडी, हुतुतू हे मैदानी खेळ रंगले. या रिंगण सोहळ्यानंतर सोहळा वेळापूरकडे मार्गस्थ झाला.

पानीव पाटी येथे ग्रामस्थांचे भक्तीपूर्ण स्वागत स्वीकारून श्री ज्ञानराजांचा पालखी सोहळा निमगाव मगराचे (पाटी) येथे पोहोचला. निमगाव, विझोरी, विजयनगर आदी ग्रामपंचायतींच्या वतीने येथे सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. शंकरनगर ग्रामपंचायतीच्या वतीने माऊलींच्या पादुकांची पूजा करण्यात आली. शंकरराव मोहिते सूतगिरणी, शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ, इकोबोर्ड इंडस्ट्रीज व पिसेवाडी ग्रामपंचायतीच्या वतीनेही सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.

वेळापूर येथे प.पू. डॉ. भाईनाथ महाराज कारखानीस ऊर्फ आनंदमूर्ती यांच्या समाधी मठाजवळील स्वागत स्वीकारल्यानंतर पालखी सोहळ्याने वेळापूर हद्दीत प्रवेश केला. त्यावेळी ग्रामस्थांनी माऊलींसह लाखो वैष्णवांचे उत्साहात स्वागत केले.

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज पंढरीस जात असताना वेळापूरनजीक टेकडीवरून त्यांना विठ्ठलाचे दर्शन झाले. त्यामुळे ते येथूनच पंढरपूरपर्यंत धावत सुटले, अशी आख्यायिका सांगितली जाते. वारकरी धाव्याच्या ठिकाणी तुकाराम महाराजांचा ''तुका म्हणे धावा, आहे पंढरी विसावा'' हा अभंग म्हणत येथून धावतात. हा विलोभनीय सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविक रस्त्याच्या कडेला गर्दी करतात. सायंकाळी अश्वानंतर एक-एक दिंडी सोडण्यात आली. त्यावेळी ''माऊली... माऊली...'' नामाचा जयघोष करीत आबालवृद्ध वैष्णव धावत वारीचा आनंद घेत होते.

भागवत संप्रदाय हा अशिक्षित व अडाणी असला तरी अंधश्रद्धाळू नाही. संत एकनाथ महाराजांनी भारूडाच्या माध्यमातून अंधश्रद्धाळू समाजावर कोरडे ओढले आहेत. भारूडातील रूपके, पात्रे, नाट्यात्मकता, भाषा व अध्यात्म अशा अनेक दृष्टींनी नाथांच्या भारूडांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. नाथांनी लोकरंजनातून लोकशिक्षण दिले ते भारूडाच्या माध्यमातून. आळंदी-पंढरपूर पायी वारीत वेळापूर येथे ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसमोर जयसिंग मोरे यांच्या रथापुढील शेडगे दिंडी क्र. ३ च्या वतीने कन्हेर (ता. माळशिरस) येथील लक्ष्मण महाराज राजगुरू यांनी ''गोंधळी गोंधळी आम्ही माऊलींचे गोंधळी'' व ''वेडी गं बाई मी झाले वेडी'' तर कृष्णा महाराज जोगदंड यांनी ''पाच रंगाच्या पाच गवळणी'' हे मानाचे भारूड सादर केले. भारूडकारांनी विविध रूपकांतील भारुडे सादर करून लोकप्रबोधन केले. सायंकाळी समाजआरतीनंतर हा सोहळा वेळापूर मुक्कामी विसावला.

उद्या दि. २२ रोजी सकाळी ठाकूरबुवा येथे गोल रिंगण, तोंडले येथे नंदाच्या ओढ्यावर दुपारचा विसावा घेतल्यानंतर संत ज्ञानदेव व संत सोपानकाका या दोन बंधूंच्या भेटीचा सोहळा होईल. त्यानंतर हा सोहळा दसूर पाटी येथे पंढरपूर तालुक्यात प्रवेश करून भंडीशेगाव मुक्कामी पोहोचेल.

# धावत्या रिक्षातून खाली पडल्याने तरुणी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**
धावत्या रिक्षातून खाली पडल्याने एक प्रवासी तरुणी जखमी झाली. हा अपघात विजापूर रोडवरील कंबर तलाव दर्गासमोर आज मंगळवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घडला. प्रशंशा हर्षवान आडसुळे (वय २४ रा.सिद्धेश्वरपेठ, सध्या रा.आदित्य नगर विजापूर रोड) असे जखमी तरुणीचे नाव आहे. त्या मंगळवारी सकाळी विजापूर रोड येथून सात रस्त्याच्या दिशेचे रिक्षातून जात होत्या. तलावा जवळील दर्गाजवळ चक्कर आल्याने त्या रिक्षातून खाली पडून जखमी झाल्या.त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुणालयात मावशी शिल्पा चांदणे यांनी दाखल केले.

# श्री गजानन महाराज पालखीचे तीर्थक्षेत्र माचणूर येथे भव्य स्वागत

## वरुण राजानेही स्वागतासाठी लावली हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ जुलै-**
श्री संत गजानन महाराज शेगाव जि.बुलढाणा येथील पालखीचे तीर्थक्षेत्र माचणूर येथे सायंकाळी श्री च्या मुर्तीला तहसिलदार मदन जाधव,गटविकास अधिकारी डॉ.जास्मिन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन प्रशासनाच्यावतीने भव्य असे स्वागत करण्यात आले. दरम्यान वरुण राजानेही यावेळी हजेरी लावली होती.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर तीर्थक्षेत्र पंढरपूरकडे विठूरायाचा गजर करत निघालेल्या श्री संत गजानन महाराज पालखीचे मंगळवारी सायंकाळी माचणूर येथील भीमा नदीच्या तीरावर आगमन होताच प्रशासनाच्यावतीने स्वागत करण्यात आले. या दिंडीमध्ये जवळपास ७०० वारकऱ्यांचा ताफा व एक अश्व सामील होते. ही पालखी दि.२१ जून रोजी शेगाव येथून निघून दि.२१ जुलै रोजी मंगळवेढा तालुक्यात प्रवेश केला. वारकऱ्यांच्या सेवेसाठी बोराळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी




जलशुध्दीकरण,एक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन ठेवले होते. वारकऱ्यांना डासाचा उपद्रव होवू नये याची काळजी घेत माचणूर व ब्रम्हपुरी या दोन्ही गावांनी धुर फवारणी तसेच रस्त्याच्या कडेला पावडर टाकली होती. वीज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता सचिन भोसले यांनी वीज खंडीत होवू नये यासाठी लाईमन कर्मचारी उपलब्ध करुन सेवा दिली. पालखीच्या आगमन प्रसंगी माचणूर,ब्रम्हपुरी,रहाटेवाडी, तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. सायंकाळी श्री ची पालखी तीर्थक्षेत्र श्री सिध्देश्वर मंदिरात मुक्कामी विसावली आहे.



सकाळी सुर्योदयानंतर ती मंगळवेढ्याकडे मार्गस्थ होणार आहे. सकाळी ११ वाजता बोराळे नाक्यावर मंगळवेढा नगरपरिषदेच्यातीने श्री च्या पालखीचे स्वागत केले जाणार आहे. माचणूर येथे स्वागत प्रसंगी माचणूरच्या सरपंच दिपाली कलुबर्मे,उपसरपंच नितीन पाटील,पंचायत समितीच्या सभापती दिपाली ताड,बोराळे पंचायत समितीच्या सदस्य जयश्री कवचाळे,जि.प.सदस्या करुणा शिवशरण, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजीव बाबर, उद्योजक जनार्दन शिवशरण पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, कर्मचारी यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक यावेळी उपस्थित होते

**जाहीर प्रसिध्दीकरण**

अर्ज-वारस दाखला मिळणेबाबत
दि.कि. अर्ज नं. ३९/२०२६ नि.नं.५

**बार्शी येथिल मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साो. यांचे कोर्टात**

१) **अर्चना उमेश हुंबे,**
वय - ३८ वर्षे, धंदा - शेती,
रा. मालेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **रोहन उमेश हुंबे,**
वय - १९ वर्षे, धंदा - शेती व शिक्षण,
रा. मालेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरुद्ध
**कोणीही नाही - सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ चे पती उमेश विलास हुंबे अर्जदार नं. २ चे वडिल हे दि. ३०/०१/२०२२ रोजी मयत झालेली आहे. उमेश विलास हुंबे यांचे पश्चात यातील अर्जदार हे जवळचे व कायदेशीर वारस आहे. यातील अर्जदार यांचे शिवाय मयत उमेश विलास हुंबे यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत उमेश विलास हुंबे यांचे पश्चात यातील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता सवलती व इतर लाभ मिळणेसाठी अर्जदारांना वारस दाखला मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी उमेश विलास हुंबे यांचे पश्चात यातील अर्जदार हिच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे झाले आहे. सबब मयत उमेश विलास हुंबे यांचे पश्चात यातील अर्जदार हेच जवळचे कायदेशार वारस ठरवून त्यांना वारस दाखला मिळणेसाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत उमेश विलास हुंबे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासुन ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता. ०१/०९/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे.
ता.२०/०७/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर**
**बार्शी ता. बार्शी**

# खुनाचा प्रयत्न, मारहाण प्रकरणी वरकटणे येथील सर्व आरोपींना जामीन मंजूर

**सोलापूर, दि. २१ जुलै-**
खुनाचा प्रयत्न व मारहाण प्रकरणी पिटूं मनसाराम बंजारा (वय २६ वर्षे), राहुल बापूसाहेब हजारे (वय ३२ वर्षे), किरण सतिश पाटील (वय ३२ वर्षे), आकाश रमेश पाटील (वय २६ वर्षे), शुभम पांडूरंग तनपुरे (वय २४ वर्षे , सर्व रा. वरकटणे, ता. करमाळा) यांची बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधिश यांनी जामीनावर मुक्तता केली.

यातील फिर्यादी हे बाराम ती येथे राहण्यास असून ते मेंढपाळ व्यवसाय करतात व जिल्हयाबाहेर मेंढया चरण्यासाठी घेऊन जातात. त्याप्रमाणे १२ एप्रिल२०२६ रोजी फिर्यादी हे वरकटणे गावातील रस्त्यावरुन मेंढपाळ, त्याचे कुटूंबिय व इतर लोक जात असतांना कांही मेंढया यातील आरोपींच्या शेतात घूसल्या. या कारणावरुन आरोपींनी फिर्यादीला काठीने, दगडाने मारहाण करुन खूनाचा प्रयत्न केला, अशा आशयाची फिर्याद दाखल केली होती. त्यामुळे यातील आरोपीनी ॲड भारत कट्टे यांचे मार्फत जामीनाचा अर्ज दाखल केला होता. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकुन न्यायाधीशांनी सर्व आरोपींना जामीन मंजूर केला. सदर प्रकरणी आरोपी तर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड.गणेश जगताप (बार्शी), ॲड.नवनाथ राखुंडे, ॲड. सुनिल घोलप (करमाळा) यांनी काम पाहिले.



# संगमेश्वर नगर येथे पैशाच्या कारणावरून तरुणाला मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** पैशाच्या कारणावरून एका तरुणावर चाकूने जीवघेणा वार केल्याची घटना १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास संगमेश्वर नगर येथे घडली. याबाबत निजाम रुकमोद्दीन बहिरामदगी (वय ३६, रा. संगमेश्वर नगर) यांनी फिर्याद दिली आहे. सिराज, रजिया, अझरोद्दीन रजाक जकलेर, सना (सर्व रा. संगमेश्वर नगर) यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. आरोपी सिराज हा त्याच्या आईकडे पैशांची मागणी करत होता. ही बाब समजावून सांगण्यासाठी फिर्यादी निजाम हे त्या ठिकाणी गेले होते. मात्र, याचा राग मनात धरून सर्व आरोपींनी एकत्र येऊन फिर्यादी निजाम आणि त्यांची बहीण यास्मिन यांना शिवीगाळ करून मारहाण केली.

**बार्शी नगरपरिषद, बार्शी**
**स्थापत्य विभाग**

**ई-निविदा सुचना क्र.११ सन २०२६/२७**

**Main Portal : http://mahatenders.gov.in**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बार्शी नगरपरिषदेकडील खालील कामाकरीता ई-नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक : २१/०७/२०२६ वेळ दुपारी १६:०० पासून दिनांक : २८/०७/२०२६ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांक : २१/०७/२६ वेळ दुपारी १६:०० पासून दिनांक : २८/०७/२०२६ वेळ दुपारी १६.०० वाजेपर्यत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे-स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे-स्लीप व्यक्तिशः स्वतःचे नावाची गोपनियता बाळगून सिलबंद लखोटयात तांत्रिक लिफाफ्या सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक २८/०७/२०२६ रोजी दुपारी १६०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व अर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक २९/०७/२०२६ रोजी दुपारी १६:०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

**टिप :-**
१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधरकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई- निविदा प्रणालिच्या Main portal- http://mahatenders.gov.in व याच http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे अवश्यक आहे.
२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर (१८००-२३३-७३१५)
३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कमेची ऑनलाईन पे-स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलाड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे-स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे अवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहवयास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. ई-निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि. २८/०७/२०२६ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**बार्शी नगरपरिषद**

# नालेसफाई गैरव्यवहारप्रकरणी महापालिकेची त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त

## रणजित टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्सच्या निविदा,

## बिले व कामांची होणार सखोल तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**
भाजपा नगरसेवक अनंत जाधव यांनी नालेसफाई कंत्राटातील कथित आर्थिक गैरव्यवहाराबाबत केलेल्या तक्रारीची दखल घेत त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली आहे. याबाबत आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी आदेश काढले आहेत.

रणजित टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स या कंत्राटदाराकडून करण्यात आलेल्या नाले सफाई कामातील निविदा प्रक्रिया, कामाची अंमलबजावणी आणि देयक वितरणातील अनियमिततेची वस्तुनिष्ठ चौकशी करण्याचे निर्देश आयुक्तांनी समितीला दिले आहेत.या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, मुख्यलेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर आणि कार्यकारी अभियंता निलकंठ मठपती यांची समिती रणजित टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या निविदा प्रक्रिया, कामाची अंमलबजावणी व देयकांची सखोल चौकशी, तपासणी करणार आहे. महापालिकेच्या नालेसफाई कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा सोमवारी झालेल्या महापालिकेच्या नालेसफाई कंत्राटातील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत चांगलाच गाजला होता.



अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, मुख्यलेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर आणि कार्यकारी अभियंता निलकंठ मठपती यांची समिती गठित करण्यात आली आहे. या समितीला निविदा कागदपत्रे, देयक अभिलेख, मोजमाप पुस्तिका (एमबी), लेखा नोंदी तसेच संबंधित सर्व कागदपत्रांची तपासणी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार, खालील 'क' वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्द कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**प्रारुप मतदार यादी प्रसिध्दी कार्यकम**

| अ. क्र. | सहकारी संस्थांची नांवे | वर्ग |
|---|---|---|
| १ | पद्मिनी महिला अर्बन को.ऑप. क्रेडिट सोसा. लि. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| २ | जय मल्हारी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसा. लि. वैराग, ता. बार्शी | क |
| ३ | गोमाता महिला अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसा. लि. चिखडे, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ४ | श्री गुरुदत्त अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसा. लि. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | क |
| ५ | श्री रामेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसा. लि. उपळे (दु), ता. बार्शी, जि. सोलापूर | क |

**वरील संस्थांची प्रारुप (कच्ची) मतदार यादी प्रसिध्दीकरणाचे वेळापत्रक**

| प्रारुप (कच्ची) प्रसिध्द करण्याचा दिनांक | प्रारुप (कच्ची) मतदार यादीवर आक्षेप अगर दावे तालुका निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर करावायाचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त न झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक | आक्षेप अगर दावे यावर तालुका निवडणूक अधिकारी यांनी द्यावयाचा निर्णयाचा दिनांक | प्रारुप मतदार यादीवर आक्षेप अगर दावे प्राप्त झाल्यास अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| २२/०७/२०२६ | २२/०७/२०२६ ते २८/०७/२०२६ | २८/०७/२०२६ | ०३/०८/२०२६ | ०३/०८/२०२६ |

**टीप :-** उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, संस्थेचे कार्यालय, संबंधित नगरपालिक, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय व संस्थेचे शाखा कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे याची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**(ए.टी. सय्यद)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी, ता. बार्शी**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# छत्रपती शिवाजी महाराज यांनी मानवी मूल्यांची, चारित्र्याची उत्तम जपणूक केली : प्रा.बानगुडे-पाटील

## श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आयोजित सांस्कृतिक महोत्सव

### गुणीजनांसह गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी मानवी मूल्यांची आणि चारित्र्याची उत्तम जपणूक केली. शिवरायांच्या स्वराज्यात स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यास थेट फाशी किंवा गडावरुन फेकून देण्याची कठोर शिक्षा होती, हा धाक म्हणजे महाराजांच्या स्त्री सुरक्षेवरील कटिबद्धतेचे प्रतीक आहे, जगाच्या पाठीवर अनेक राजे होऊन गेले, मात्र छत्रपती शिवरायांसारखा चारित्र्य संपन्न पराक्रमी राजे झाले नाहीत, शिवरायांच्या विचाराची आजच्या युगाला गरज आहे, असे प्रतिपादन ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानगुडे-पाटील यांनी केले.

श्रीस्वामी समर्थ अमंडळाच्या ३९ वा वर्धापनदिन व गुरुपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवांतर्गत 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर बोलताना ते पुढे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक राजा नव्हते तर ते एक महान व्यक्तिमत्व होते त्यांचे विचार आणि कार्य आपल्याला कायमच प्रेरणा देत राहील.

लाख मेले तरी चालतील लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे, असे अनेक योध्दे छत्रपती शिवाजी महाराज यांना भेटले. शिवा काशिद, बाजीप्रभु देशपांडे असे अनेक योध्दे स्वराज्यासाठी कामी आले. लोककल्याणकारी स्वराज्य असे छत्रपतीचे राज्य होते. छत्रपती शिवाजी महाराज भारतीय नौदलाचे जनक होत. संकटाशी भिडायचं आणि लढायचं, असे शिवचरित्र हे एकमेव चरित्र आहे. शिवरायांचे युध्दशास्त्र, गनिमी काव्याच्या नितीचा अभ्यास अवघं जग करीत होते-आहे.

परिस्थिती कशीही असो महाराजांनी अशी माणसे घडविली ते मी करणारच. राज्य राखीव दल अनुकंप भरती, धारातीर्थी विर पत्नीला मरेपर्यंत पेन्शन ही निती प्रथम छत्रपती शिवरायांनी राबविली. किती आहोत पेक्षा आपण कोण आहोत हे दाखवणारे मराठे होते एक मराठा लाख मराठा होते परिणामाची पर्वा न करणारे मराठा होते म्हणूनच ते कमी असुनही जिंकत होते. १७ व्या शतकातील छत्रपती शिखाजी महाराज हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे एकमेव योध्दे राजे होते, असेही त्यांनी सांगितले.



### अन्नछत्र मंडळाचा सार्थ अभिमान

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने गेल्या २७ वर्षापासून धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. ही बाब प्रबोधनकारी असून, सामाजिक कार्याने देखील गरुड भरारी घेतली आहे. आशा कार्याचा सार्थ अभिमान आहे, असे व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन विश्वस्त व माजी उपमहापौर दिलीपभाऊ कोल्हे, जि.प. सदस्य प्रवीण तानवडे, तालुका अध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, दिलीपभाऊ सिद्धे, नगरसेवक यशवंततात्या धोंगडे, अध्यक्ष भाजपा पूर्व मंडल व मा.सरपंच प्रदीप पाटील, नगरसेवक अविनाश मडीखांबे, तालुका अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले गट), नगरसेवक तम्मा मामा शेळके, मा.सदस्य,पंचायत समिती बाळासाहेब मोरे, पंचायत समिती सदस्य गणेश मोरे, अमोल हिप्परगी, अध्यक्ष भाजपा उत्तर मंडल, डॉ. मनोहर मोरे, खजिनदार संजयजी उर्फ लाला राठोड, जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक विभाग, फैजअहमद उर्फ नन्नु कोरबू, बाळासाहेब दाभेकर यांचे निकटवर्तीय सहकारी, शिरीष मावळे काका, मयूर कडू, उमेश गालिंदे, भाऊ भिताडे, निलेश वावरे, बाबासाहेब निंबाळकर सर, मोतीराम राठोड,मा.तालुकाअध्यक्ष, भाजपा, सामाजिक कार्यकर्ते शिवराज स्वामी, सरपंच दहिटणे ग्रामपंचायत-नितीन मोरे, सोलापूर बी.वाय. टेलरचे किरण येज्जा, श्रीकांत शिंदे, शरद कागदे, युवराज मुचलंबे, विशाल भांगे यांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी डेव्हीन ग्रुप मुंबई यांनी नृत्यातून शिवरायांचे गाणे सदर केले. याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व छत्रपती शिवाजी महाराजांची रेखीव, सुबक प्रतिमा व कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी व विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. या बरोबरच सिद्धाराम माळी व अप्पू कलशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्य या कार्यक्रमप्रसंगी सत्कार करण्यात आला.यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, क्रांती वाकडे, अनिता गडदे, धनश्री पाटील, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, विश्वस्त- लक्ष्मण पाटील, भाऊ कापसे, लाला राठोड, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, मनोज निकम, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, मैनुद्दीन कोरबू, अश्पाक काझी, ओंकारेश्वर उटगे, प्रभाकर मजगे, शिवशरण खुबा, प्रमोद पोतदार, अँड.संतोष खोबरे, रोहित खोबरे, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, निखील पाटील, विशाल कलबुर्गी, विलास राठोड, रोहन शिर्के, अतिश पवार, प्रवीण घाटगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, आकाश गडकरी, कुमार सलबत्ते, सुलतानपूर सरपंच मल्लिकार्जुन स्वामी, किणीवाडी सरपंच शिवयोगी तंबोळे, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, सुभाष गडसिंग, मोहनराव शिंदे, संजय फुटाणे, बाबा स्वामी, दयानंद काजळे, शकील नाईकवाडी, किरण जाधव, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, महांतेश स्वामी, संजय गोंडाळ, प्रसाद मोरे, शंभूलिंग अकतनाळ, शिवा याळवार, दयानंद दणुरे, अरविंद पाटील, सत्तार शेख, योगेश पवार, प्रदीप सुरवसे, वैभव मोरे, फहीम पिरजादे, बालाजी कटारे, पिंटू साठे, धनप्पा उमदी, सागर शिंदे, केदार तोडकर, नुराद्दिन खासबागदार, प्रीतेश किलजे, राजाराम पवार, आनंदखजुर्गीकर, प्रकाश गडगडे, आकाश सूर्यवंशी, विनायक भोसले, भरत राजेगावकर, मल्लिकार्जुन बिराजदार, प्रा. शरणप्पा आचलेर, गोविंदराव शिंदे, लक्ष्मण शिंदे, अभिषेक चव्हाण, निखील शिंदे, अमित कोळी, ज्ञानेश्वर भोसले, समर्थ चव्हाण, असद फुलारी, संतोष माने, रमेश हळसंगी, सुमित कल्याणी, राहुल इंडे, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी अविनाश मडीखांबे यांच्या वाढदिवसानिमित्त न्यासाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

### गुणीजन व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

विशेष गौरव पुरस्कार एम.बी.पाटील सर यांना देऊन सन्मान करण्यात आला व गुणीजन गौरव पुरस्काराने अभिमन्यू ताड, सत्यभामा पवार (निंबाळकर), राजू म्हेत्रे, राहूल इंगळे, होमगार्ड यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत व पदवी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल व मंडप सजावट कल्लप्पा छकडे यांनी केले.

## डेंग्यूविरुध्द भारताला पहिले लसीचे कवच; 'क्यूडेंगा'ला 'डीसीजीआय'ची मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**

पावसाळ्यात वेगाने पसरणाऱ्या डेंग्यू आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी भारताने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया यांनी 'टाकेडा बायो फार्मास्युटिकल्स'च्या 'क्यूडेंगा' या डेंग्यू प्रतिबंधक लसीला अधिकृत मंजुरी दिली आहे. भारतात मंजूर झालेली ही पहिलीच डेंग्यू लस असून, ४ ते ६० वर्षे वयोगटातील नागरिकांसाठी ती उपलब्ध होणार आहे. या लसीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, लस घेण्यापूर्वी संबंधित व्यक्तीला पूर्वी डेंग्यू झाला होता की नाही, यासाठी कोणतीही वैद्यकीय चाचणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भाव असलेल्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम राबविणे अधिक सुलभ होणार आहे.

सन २०२२ पासून 'क्यूडेंगा'ला जगातील ४३ देशांमध्ये मंजुरी मिळाली असून आतापर्यंत सुमारे ३.२ कोटी डोस वितरित करण्यात आले आहेत. दीर्घकालीन अभ्यासांमध्ये ही लस डेंग्यूचा धोका कमी करण्यासह रुग्णालयात दाखल होण्याची शक्यता घटविण्यात प्रभावी असल्याचे आढळून आले आहे. डेंग्यू विषाणूच्या चारही सिरोटाइप्सवर ही लस प्रभावी मानली जाते. डेंग्यू लसीबाबत महत्त्वाच्या बाबी याप्रमाणे; भारतातील पहिली मंजूर डेंग्यू लस 'क्यूडेंगा'. ४ ते ६० वर्षे वयोगटासाठी मान्यता. पूर्वी डेंग्यू झाला होता का? याची चाचणी आवश्यक नाही. डेंग्यूच्या चारही प्रकारांवर प्रभावी. ४३ देशांमध्ये आधीच वापर सुरू. आतापर्यंत ३.२ कोटी डोस वितरित. भारतात बायोलॉजिकल ईच्या सहकार्याने उत्पादन वाढविण्याची तयारी.

दरम्यान, डेंग्यूपासून बचावासाठी घराभोवती पाणी साचू देऊ नका. पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करा. डासप्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रे वापरा. ताप, अंगदुखी, डोकेदुखी किंवा पुरळ दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या. स्वतःहून वेदनाशामक औषधे घेणे टाळा; वैद्यकीय सल्ल्यानुसारच उपचार करा, असे आवाहन करण्यात आले.

## दुषित पाण्यामुळे एकाच इमारतीतील ४० जणांना अतिसारची लागण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जुलै-**

सततच्या पावसामुळे ड्रेनेज ओव्हरफ्लो होऊन जलवाहिनीत दूषित पाणी मिसळल्याचा संशय व्यक्त होत असताना होटगी रोड परिसरातील आसरा चौक येथील एस.बी. प्लाझा या इमारतीतील तब्बल ४० जणांना अतिसाराची लागण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दरम्यान, महापालिकेच्या वतीने तातडीने जलवाहिनी, ड्रेनेजची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली.

एस.बी. प्लाझामध्ये ३५ कुटुंबे वास्तव्यास असून सर्व फ्लॅटना एकाच जलवाहिनीतून पाणीपुरवठा होतो. परिसरातील जुनी ड्रेनेज लाईन ओव्हरफ्लो झाल्याने मैलामिश्रित पाणी जलवाहिनीत शिरल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकाच इमारतीतील मोठ्या संख्येने नागरिक आजारी पडल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाने घटनास्थळी धाव घेतली. महापालिकेच्या साथरोग तज्ज्ञ डॉ. सुहासिनी वाळवेकर यांनी प्राथमिक पाहणीनंतर हा प्रादुर्भाव दूषित पाण्यामुळे झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला. परिसरात स्वच्छता मोहीम, निर्जंतुकीकरणाची फवारणी करण्यात आली असून ३५ घरांतील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. अहवालानंतर संसर्गाचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.



धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सार्वजनिक ठिकाणी गांजा सेवन; तिघे गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

धाराशिव शहरातील इंदिरानगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी चिलीममधून गांजा सेवन करत असलेल्या तिघांविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.५० वाजता इंदिरानगर येथील सुलभ शौचालयाच्या भिंतीलगत सार्वजनिक ठिकाणी अभिषेक धोंडीराम राठोड (वय २६, रा. जय सेवालाल कॉलनी, धाराशिव), किरण सुभाष राऊत (वय ३१, रा. रामनगर, सांजा चौक, धाराशिव) आणि आकाश अनिल कसबे (वय २१, रा. वाघोली, ता. जि. धाराशिव) हे चिलीममध्ये गांजा भरून त्याचे सेवन करत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध अमली पदार्थ व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम (एनडीपीएस क्ट), १९८५ मधील कलम ८(क) व २७ अन्वये धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.२१ जुलै -**

महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सहकुटुंब तुळजाभवानी मातेची अभिषेकपूजा करून दर्शन घेतले. राज्याच्या समृद्धी, जनतेच्या आरोग्य आणि शांततेसाठी त्यांनी देवीच्या चरणी प्रार्थना केली. मंदिर संस्थानाच्या वतीने त्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख यांनी देवीची प्रतिमा व साडी भेट देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले, अमरराजे कदम, मोहन पनुरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, पोलीस प्रशासन, मंदिर संस्थानाचे अधिकारी आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.



### चिंचोलीतून दिंडी पंढरपूरकडे रवाना

**तुळजापूर, दि.२१ जुलै -**

तालुक्यातील चिंचोली येथून हभप. कैलासवासी हरिचंद्र महाराज तळेगावकर यांच्या आशीर्वादाने ग्राम स्थांच्या संकल्पनेतून १९ जुलै रोजी वारकऱ्यांची पायी दिंडी पंढरपूरकडे रवाना झाली. या दिंडीत चिंचोली गावातील सुमारे ९० ते १०० वारकरी सहभागी झाले असून, मार्गात आणखी वारकरी दिंडीत सहभागी होत आहेत. टाळ, मृदंग, वीणेच्या गजरात आणि भक्तिमय अभंगांच्या सुरावटीत वारकरी आनंदाने विठ्ठलनामाचा गजर करत पंढरीच्या दिशेने मार्गस्थ झाले. या वारीदरम्यान प्रसाद उत्तम कदम पाटील यांच्या वतीने संपूर्ण अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती वारकऱ्यांनी दिली.




### राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या नूतन जिल्हाध्यक्षांचा नळदुर्गमध्ये सत्कार

**नळदुर्ग, दि.२१ जुलै -**

राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी वसंत पवार आणि महिला आघाडीच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी नगरसेविका छमाबाई राठोड यांची निवड झाल्याबद्दल नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. भारतीय जनता पार्टी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात नगराध्यक्ष बसवराज धरणे आणि विलास येडगे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन दोन्ही पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी नगरसेवक तानाजी जाधव, सतीश राठोड, प्रमोद जाधव, पप्पू पाटील यांच्यासह बंजारा समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना छमाबाई राठोड यांनी बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर वसंत पवार यांनी राष्ट्रीय बंजारा परिषद समाजहितासाठी कार्यरत असून समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सतीश राठोड यांनी केले.




### रोटरी क्लब तुळजापूरला 'मेंबरशिप डेव्हलपमेंट प्लॅटिनम पुरस्कार'

**तुळजापूर, दि.२१ जुलै -**

सोलापूर येथील पद्मावती कन्व्हेन्शन हॉलमध्ये आयोजित रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर पदग्रहण सोहळ्यात रोटरी क्लब तुळजापूरला उल्लेखनीय सदस्यवाढीबद्दल रोटरी इंटरनॅशनलचा प्रतिष्ठेचा 'मेंबरशिप डेव्हलपमेंट प्लॅटिनम पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. जयेश पटेल आणि डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो. नितीन कुदळे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. रोटरी क्लब तुळजापूरने सदस्यवाढ मोहिमेत १३ नवीन सदस्यांची नोंद करून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाची दखल घेत क्लबला प्लॅटिनम पुरस्कार व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. यावेळी क्लबचे अध्यक्ष रो. अमर हंगरगेकर, सचिव रो. संजॉय मैंदर्गी, पीडीजी रो. विष्णू मोंढे यांच्यासह क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# पंचायत समितीतील कथित तोडफोड प्रकरणी कर्मचारी संघटनांची कठोर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जुलै -**



तुळजापूर पंचायत समिती कार्यालयातील कथित तोडफोड, शासकीय कागदपत्रांचे नुकसान, गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या कथित धमक्या तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांवर दबाव टाकण्यासाठी खोट्या तक्रारी करण्यात आल्याचा आरोप करत विविध कर्मचारी संघटनांनी पोलीस उपअधीक्षकांकडे निवेदन सादर करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

तुळजापूर तालुका ग्रामपंचायत अधिकारी संघटना, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन (जिल्हा शाखा, धाराशिव) तसेच महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटना यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंचायत समितीतील एका प्रशासकीय चौकशीच्या पार्श्वभूमीवर काही व्यक्तींनी गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात गोंधळ घालत कार्यालयातील साहित्याची तोडफोड केली व शासकीय कागदपत्रांचे नुकसान केले. या प्रकरणी प्रशासनाने संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनांच्या आरोपानुसार, या कारवाईचा आकस धरून काही व्यक्तींनी पंचायत समितीतील प्रामाणिक अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (अॅट्रॉसिटी) तसेच विनयभंगासारख्या गंभीर स्वरूपाच्या खोट्या तक्रारी दाखल करण्यासाठी अर्ज दिले. तसेच गटविकास अधिकाऱ्यांना सार्वजनिकरित्या धमकावण्यात आल्याचाही दावा करण्यात आला आहे. शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावण्यापासून परावृत्त करण्यासाठी अशा प्रकारचा दबाव टाकणे अत्यंत गंभीर असून, त्यामुळे प्रशासनाच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होत असल्याचे संघटनांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांना कथित धमक्या देणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, खोट्या तक्रारींची सखोल चौकशी करून योग्य निर्णय घ्यावा तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित वातावरण व आवश्यक पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ कर्मचारी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## वारंवार धमकी देत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ जुलै -**

परंडा तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष व जीवे मारण्याची धमकी देत वारंवार लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ डिसेंबर २०२५ ते १९ जुलै २०२६ या कालावधीत आरोपीने पीडितेला माझ्याशी लग्न कर, अन्यथा तुझ्या आई-वडिलांना जीवे मारून टाकीन, अशी धमकी



देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच, दोघांमधील संबंधांचे चित्रीकरण व्हायरल करण्याची धमकी देत तिला भयभीत केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

पीडितेने २० जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## उमरग्यात आज 'महाराजस्व समाधान शिबिर' व महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ जुलै -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून महसूल विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने २२ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीत विधानसभा मतदारसंघनिहाय 'महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन

या उपक्रमांतर्गत उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे महाराजस्व समाधान शिबिर मंगळवार, २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता आदर्श महाविद्यालय, उमरगा येथे होणार आहे. शिबिरामध्ये महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणार असून, विधानसभा स्तरावरील विशेष लाभांचेही वितरण केले जाणार आहे.

शिबिराचे उद्घाटन खासदार ओमप्रकाश निंबाळकर, विधानपरिषद सदस्य बसवराज पाटील आणि आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हादळकर, तसेच उमरगा व लोहारा तालुक्यातील नगराध्यक्ष, पंचायत समिती सभापती आणि अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

याचबरोबर मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष आणि शरण पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात उमरगा व लोहारा तालुक्यातील नागरिकांना विविध आरोग्यविषयक सेवा व तपासण्यांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या दोन्ही शिबिरांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे (उमरगा), उपविभागीय अधिकारी सागर नन्नवरे (लोहारा), तहसीलदार रणजितसिंह कोळेकर (लोहारा) आणि तहसीलदार गोविंद येरमे (उमरगा) यांनी केले आहे.

## पाडोळी मंडळातील पिक विमा वंचित शेतकऱ्यांना न्याय द्या : अॅड. व्यंकट गुंड




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील पाडोळी (आकुबाई) महसूल मंडळातील पात्र शेतकरी सन २०२५ खरीप हंगामातील पिक विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. व्यंकट गुंड पाटील यांनी जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

तसेच राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनाही ई-मेलद्वारे सविस्तर निवेदन पाठविण्यात आले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील बहुतांश महसूल मंडळांतील पात्र शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मंजूर झाला असताना पाडोळी (आ.) मंडळातील सारोळा, चिखली, राजुरी, कामेगाव, बोरगाव, सांगवी, समुद्रवाणी, लासोना, मेंढा, घुगी, येवती आणि नितळी येथील अनेक पात्र शेतकरी तांत्रिक कारणांमुळे अद्याप लाभापासून वंचित आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे मोठे नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांना केवळ तांत्रिक कारणांमुळे विमा लाभ नाकारला जाणे अन्यायकारक असल्याचे सांगत, संबंधित प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि सर्व पात्र शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ मंजूर करावा, अशी मागणी अॅड. व्यंकट गुंड पाटील यांनी केली. यावेळी रुपामाता परिवाराचे राजेंद्र सुर्यवंशी, अमोल गुंड, गजानन पाटील आणि अनिकेत नवले उपस्थित होते.

दरम्यान, पाडोळी (आ.) महसूल मंडळातील पिक विम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना लवकर न्याय मिळावा, यासाठी शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

### तुळजापूरात कारची काच फोडून दीड लाखांची रोकड लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

शहरातील घाटशिळ पार्किंग परिसरात उभी असलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्याने दीड लाख रुपयांची रोकड व महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी नागराज सदानंद मडीवाळ (वय २९, रा. चिंचवाडा गाव, पाली, ता. बिचोली नॉर्थ, जि. नॉर्थ गोवा) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. १९ जुलै रोजी घाटशिळ पार्किंग, स्मशानभूमी रोड, इदगाहजवळ उभी असलेल्या स्कोडा स्लाविया (क्र. जी-०४-ए-९१५६) या कारच्या डाव्या बाजूची काच फोडून अज्ञात चोरट्याने पर्समधील १.५० लाखांची रोकड तसेच कागदपत्रे चोरून नेली. या प्रकरणी तुळजापूर पोलीसात गुन्ह नोंद केला आहे.

## मारहाणीच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; पतीविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

तालुक्यातील आसु येथे विवाहितेने कथित मारहाणीच्या त्रासाला कंटाळून विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याप्रकरणी तिच्या पतीविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, निता मोहन देवकर (वय ३९, रा. आसु, ता. परंडा) यांनी १६ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. या प्रकरणी अमोल हनुमंत गिलबिले (वय ३२, रा. आष्टा, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी २० जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीत, आरोपी मोहन सुभाष देवकर (रा. आसु, ता. परंडा) हा पत्नी निता हिला दगड व काठीने मारहाण करत असल्याने त्या सतत मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळल्या होत्या. या त्रासातूनच त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## भाजप ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा व नीट गुणवंताचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ जुलै -**

भारतीय जनता पक्ष, अणदूर तसेच भाजप नेते दीपक आलुरे यांच्या वतीने भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा आणि नीट-२०२६ परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ५९४ गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या समर्थ मल्लीनाथ लंगडे यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.



यावेळी बोलताना भाजप नेते दीपक आलुरे म्हणाले, आपल्याच माणसांनी केलेला सन्मान ही मोठी प्रेरणा असते. सन्मान हा कार्य, प्रेरणा आणि यशाचा गौरव असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमांचे आयोजन निश्चितच स्तुत्य आहे.

या कार्यक्रमात भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विजय शिंगाडे, जिल्हा उपाध्यक्ष दीपक घोडके आणि जिल्हा सरचिटणीस प्रवीण पवार यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला साहेबराव घुगे, सिद्राम शेटे, डॉ. नागनाथ कुंभार, चंद्रशेखर कंदले, दशरथ गायकवाड, उमाकांत करपे, दयानंद मुडके, प्रवीण घोडके, निलेश आलुरे, बालाजी कुलकर्णी, लक्ष्मण बोंगरगे, इमाम शेख, नवनाथ मिटकरी, काशीनाथ घुगे, दत्ता नन्नवरे, सोमनाथ लंगडे, अविनाश कांबळे, लक्ष्मण गायकवाड, शिवकुमार स्वामी, अमोल महाबोले, संभाजी काळजाते, मेजर माने, मेजर सुरवसे, महेश आपटे, तानाजी जाधव, अस्लम शेख आणि सार्थक मोहराळे यांच्यासह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# शिक्षक पुन्हा वर्गाबाहेर! विद्यार्थ्यांना शिकवणार कोण?

### शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणाला तात्पुरती स्थगिती द्या; उमाकांत कुलकर्णी यांचे शिक्षण संचालकांना पत्र...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

राज्यात सध्या मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एसआयआर) मोहिमेमुळे शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा मोठा ताण असल्याने शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांच्या सर्वेक्षण कार्यक्रमास तात्पुरती स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी राज्य प्राथमिक शिक्षण संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाने २९ जून २०२६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार १५ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, त्याच काळात राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनर्निरीक्षण (एसआयआर) मोहिमेचे काम युद्धपातळीवर सुरू असून बहुतांश शिक्षक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून कार्यरत आहेत. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, एसआयआर मोहिमेमुळे शिक्षकांना गृहभेटींसह विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आहेत. त्यामुळे नियमित अध्यापन व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे.



अशा परिस्थितीत शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणाची अतिरिक्त जबाबदारी सोपविल्याने शिक्षकांवरील ताण अधिक वाढत असून निवडणूक आयोगाच्या कामातही अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच जनगणना, बीएलओ, एसआयआर, नवीन अभ्यासक्रमाची प्रशिक्षणे आणि नवभारत साक्षरता अभियान यांसारख्या विविध अशैक्षणिक कामांमुळे शाळांचे दैनंदिन कामकाज विस्कळीत होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांचे हित आणि शिक्षकांचे मानसिक आरोग्य लक्षात घेऊन शाळाबाह्य बालकांच्या सर्वेक्षणासंबंधीचे परिपत्रक मागे घ्यावे अथवा सद्यस्थितीत या कार्यक्रमाला तात्पुरती स्थगिती द्यावी, अशी मागणी राज्य कार्याध्यक्ष कुलकर्णी यांनी केली आहे.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठाची ऐतिहासिक कामगिरी

## उस्मानिया विद्यापीठासाठी अत्याधुनिक माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ जुलै -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने देशातील १०९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या उस्मानिया विद्यापीठ, हैदराबादसाठी अत्याधुनिक 'विद्यापीठ माहिती व्यवस्थापन प्रणाली' विकसित करून उच्च शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे. ही प्रणाली १८ जुलै, २०२६ रोजी उस्मानिया विद्यापीठात अधिकृतपणे लोकार्पित करण्यात आली. या कामगिरीमुळे महाराष्ट्रातील दुसऱ्या विद्यापीठासाठी उद्योगमानक दर्जाची डिजिटल प्रणाली विकसित करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ ठरले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली हा सल्लागार प्रकल्प विद्यापीठाच्या तज्ज्ञ पथकाने यशस्वीपणे पूर्ण केला. प्रकल्पाचे नेतृत्व डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. रुपाली एस. जैन यांनी केले.

या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. आमच्या तज्ज्ञ पथकाने जागतिक दर्जाची तांत्रिक क्षमता सिद्ध केली आहे. राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाला नवी ओळख मिळवून देणाऱ्या डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. रुपाली एस. जैन आणि संपूर्ण पथकाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. भविष्यातही विद्यापीठ अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे देशातील शैक्षणिक संस्थांना तांत्रिक सहकार्य देत राहील.

प्रकल्प प्रमुख डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी म्हणाले, उस्मानियासारख्या देशातील प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक विद्यापीठासाठी ही प्रणाली विकसित करणे आमच्यासाठी मोठे आव्हान होते. मात्र, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी दाखविलेला विश्वास, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यापीठ प्रशासनाचे सहकार्य यामुळे हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करता आला. ही केवळ सॉफ्टवेअर निर्मिती नसून, उच्च शिक्षणातील डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

नव्याने विकसित करण्यात आलेली ही माहिती व्यवस्थापन प्रणाली उस्मानिया विद्यापीठातील शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान व कार्यक्षम बनविणार आहे. सर्व महत्त्वाची कागदपत्रे डिजिटल स्वरूपात एका क्लिकवर उपलब्ध होणार असून, शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासनासाठी कामकाज अधिक सुलभ होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांच्यासह उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. कुमार मोलुगरम, कुलसचिव प्रा. जी. नरेश रेड्डी, कुलगुरूंचे विशेष कार्याधिकारी प्रा. एस. जितेंदर कुमार नाईक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक प्रा. सिरीशा तसेच सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राचार्य आणि गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

या ऐतिहासिक कामगिरीमुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवोपक्रम, डिजिटल उत्कृष्टता आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळे स्थान अधोरेखित केले असून, 'डिजिटल भारत' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीतून बळकटी दिली आहे.ही मांडणी वृत्तपत्रीय शैलीत असून, बातमीचा प्रवाह कायम ठेवत कुलगुरू आणि डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रतिक्रिया नैसर्गिकरित्या समाविष्ट करण्यात आली आहे.

# हाणेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज लसीचा तुटवडा

**तभा वृतसेवा**
**हानेगाव, दि. २१ जुलै -**

देगलूर तालुक्यातील हाणेगाव येथे शनिवार दि. १८ रोजी एका संशयित पिसाळलेल्या कुत्र्याने परिसरातील अनेक नागरिकांना व भटक्या कुत्र्यांना तसेच जनावरांना चावा घेतल्याची अत्यंत दुर्दैव आणि गंभीर घटना येथे घडली आहे. या हल्लूयामुळे संपूर्ण गावात व परिसरात तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे. एकाच दिवसात अनेकांना कुत्र्याने चावल्याने जखमी नागरिकांना उपचारासाठी तात्काळ हाणेगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली असता तिथे पोचल्यावर त्यांना जी परिस्थिती दिसली अत्यंत गंभीर आहे. या गावाला कोणी वाली आहे की नाही?असा सवाल उपस्थित नागरीकांना पडला आहे.

गेल्या वर्षभरापासून या आरोग्य केंद्रात रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाप समोर आली आहे. निवडणुका आल्यावर मतासाठी पुढारी दारात येऊन मोठमोठे आश्वासन देतात आणि पाच वर्षात एकदा ही आरोग्य केंद्रास भेट देत नाहीत मग लोकांना सुविधा कसे मिळणार असा सवाल नागरीक वर्गातुन होत आहे स्थानिक लोकनेते,पुढारी आज नागरिकांच्या या ज्वलंत समस्येवर पूर्णपणे मुग गिळुन गप्प का बसले? आहेत असा संतप्त सवाल आता हनेगावच्या जनतेतून विचारला जात आहे.येथील आरोग्य यंत्रणेचा कारभार रामभरोसे झाला आहे. नुकताच एका महिलेचा सर्पदंशाने मृत्यू ही झाला आहे येथील सुनिता सूर्यकांत पटणे वय ४७ या आपल्या सोयाबीन पिकात खुरपंनच काम करत असताना त्यांना विषारी सापाने दंश केला उपचारासाठी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले परंतु योग्य उपचारा अभावी प्रकृती गंभीर असल्याने त्यांना औराद आणि नंतर बिदर येथे हलवले दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला .वेळेवर व योग्य उपचार न मिळाल्यामुळे गरीब रुग्णांना असा नाहक जीव गमवावा लागत असल्याने ग्रामस्थातून संताप व्यक्त होत आहेपरिसरातील जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या उदासीन प्रशासन व लोकनेत्यांनी लवकरात लवकर या गंभीर विषयाकडे बारकाईनं लक्ष द्यावे असे ग्रामस्थांतुन मागणी होत आहे.

## इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ साठी नोंदणी सुरू

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांच्या निर्देशानुसार इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ या देशातील प्रतिष्ठित राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे यांनी केले आहे.राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद यांच्या माध्यमातून दर दोन वर्षांनी आयोजित होणारी ही स्पर्धा व्यावसायिक शिक्षण व कौशल्य क्षेत्रातील गुणवंत युवक-युवतींना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सादर करण्याची संधी उपलब्ध करून देते. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांची निवड राज्यस्तर आणि राष्ट्रीय फेऱ्यांसाठी केली जाते. राष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरलेल्या स्पर्धकांना भारताचे प्रतिनिधित्व करत थीश्रवड्ढ्ळश्रश्री ऊशिींळींळेप मध्ये सहभागी होण्याची संधी मिळते.स्पर्धा विविध कौशल्य क्षेत्रांमध्ये वैयक्तिक (खपवळींळर्वीरश्र) तसेच सांघिक (ढशरा) स्वरूपात होणार आहे. बहुतांश कौशल्यांसाठी उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. तर सायबर सुरक्षा, उद्योग ४.०, मेकॅट्रॉनिक्स, रोबोट प्रणाली एकत्रीकरण, स्वायत्त मोबाइल रोबोटिक्स, काँक्रीटचे बांधकाम कार्य आणि डरपवीलरशित्र्रीवशपळपस या ढशरा ड्ड्ळश्रश्री साठी उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.स्पर्धेसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात येणार असून विविध उद्योग, क्षेत्रीय कौशल्य परिषदा तसेच व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), पॉलिटेक्निक महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठे, शाळा, प्रशिक्षण संस्था, उद्योग तसेच कौशल्य विकासाशी संबंधित संस्थांनी पात्र उमेदवारांमध्ये या स्पर्धेबाबत जनजागृती करून त्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरकुल लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवा : मारोती दिवसे पाटील

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २१ जुलै -**



पंतप्रधान घरकुल आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांच्या अनुदानाचा पुढील हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी किनवट पंचायत समितीतील संबंधित अभियंते व ऑपरेटर १५ ते २० हजार रुपयांची लाच मागत असल्याचा गंभीर आरोप शिवसेना तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील यांनी केला आहे. या प्रकरणातील दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई करून उच्चस्तरीय चौकशी करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

निवेदनानुसार, घरकुलाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर दुसरा ७० हजार रुपयांचा हप्ता तसेच अंतिम बिल मंजूर करण्यासाठी लाभार्थ्यांकडून १५ ते २० हजार रुपयांची मागणी केली जात आहे. पैसे न दिल्यास विविध त्रुटी काढून फाईल प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे अनेक गरीब लाभार्थ्यांना वर्षभरापासून पंचायत समिती कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तालुक्यातील अनेक गावांतील लाभार्थ्यांनी अशा प्रकारच्या तक्रारी केल्याचा दावा करत, घरकुल योजनेत गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप मारोती दिवसे पाटील यांनी केला आहे. शासनाची महत्त्वाकांक्षी योजना स्थानिक पातळीवरील कथित भ्रष्टाचारामुळे बदनाम होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अभियंते व ऑपरेटर यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच रखडलेले अनुदान तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने योग्य ती कारवाई न केल्यास किनवट पंचायत समिती कार्यालयासमोर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

**विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड**
**नोंदणी क्रं. एफ-२८ नांदेड**

दि. २१/०७/२६

**निवडणूक कार्यक्रम**

विमुक्त जाती सेवा समिती वसंतनगर कोटग्याळ ता. मुखेड जि. नांदेड नोंदणी क्रं. एफ-२८ नांदेड या संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवडणुक सन २०२६ ते २०२९ या ३ वर्षाच्या कालावधी करीता निवडणूक घेण्यासाठी कार्यकारी मंडळाने दिनांक १४/०७/२०२६ रोजीच्या सभेतील ठरावाच्या अनुषंगाने कळविण्यात आल्यावरुन निवडणूक अधिकारी म्हणून माझी नियुक्ती केलेली आहे. त्या नुसार संस्थेच्या नियम व नियमावलीतील तरतुदीनुसार संस्थेवर सन २०२६ ते २०२९ या ३ वर्षा करीता कार्यकारी मंडळ निवडणे आहे व ज्यात अध्यक्ष १, उपाध्यक्ष-१, सचिव-१, सहसचिव-१, कोषाध्यक्ष-१ व इतर ४ कार्यकारी सदस्य निवडण्यात येतील. कार्यकारी मंडळ सन २०२६ ते २०२९ करीता निवडण्यासाठी मी खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम न्यासाच्या नोटीस बोर्डावर व वृत्तपत्रात जाहीर करीत आहे व निवडणूक कार्यक्रम पत्रीकेतील नमुद सर्व कार्यक्रम दिनांक ०८/०८/२०२६ रोजी संस्थेच्या कार्यालयात वसंतनगर, ता. मुखेड, जि. नांदेड या ठिकाणी पार पडतील. तसेच याची प्रत न्यासाच्या सर्वसाधारण सभेच्या नोटीस सोबत निर्गमित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवडणुकी बाबत कार्यक्रम | वेळ |
|---|---|---|
| १) | प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द करणे | सकाळी १०.०० वा. |
| २) | मतदार यादीवर लेखी आक्षेप घेणे | सकाळी १०.१५ ते १०.४५ वा. |
| ३) | मतदार यादीवर लेखी आक्षेप आल्यास त्यावर सुनावणी व निर्णय घेणे. | सकाळी १०.४५ ते ११.३० वा. |
| ४) | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | सकाळी ११.४५ वा. |
| ५) | उमेदवारी अर्ज वाटप करणे | दुपारी १२.०० ते १२.३० वा. |
| ६) | उमेदवारी अर्ज स्वीकारणे | दुपारी १२.३० ते ०१.०० वा. |
| ७) | उमेदवारी अर्ज छाननी व वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दुपारी १.०० ते १.३० वा. |
| ८) | उमेदवारी अर्ज परत घेणे | दुपारी १.३० ते १.४५ वा. |
| ९) | उमेदवारी अर्ज परत घेतल्यानंतर अंतिम उमेदवारी अर्जाची यादी प्रसिध्द करणे | दुपारी २.०० वा. |
| १०) | आवश्यकता असल्यास गुप्त मतदान घेण्याची वेळ | दुपारी २.१५ ते ३.१५ वा |
| ११) | निकाल जाहीर करणे | दुपारी ४.०० वा. |

**उमेदवारांना सुचना :**

१) उमेदवाराने उमेदवारी अर्ज घेतांना आपले ओळखपत्र सोबत ठेवावे व उमेदवारी अर्ज दाखल करतांना त्यासोबत ओळखपत्र जोडावे. प्रत्येक उमेदवारांनी त्यांचा उमेदवारी अर्ज स्वतः घ्यावा. उमेदवारी अर्ज घेण्यासाठी मुख्त्यारपत्र, अधिकारपत्र तसेच इतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत.
२) संस्थेच्या नियमावलीतील सर्व नियम उमेदवारांना बंधनकारक राहतील.
३) उमेदवारी अर्ज भरतांना स्वतःचे, सुचकाचे व अनुमोदकाचे संपूर्ण नांव लिहावे व सभासद यादीतील अनुक्रमांक तसेच इतर सर्व बाबी लिहिणे आवश्यक आहे.
४) निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे वेळेचे बंधन सर्व सभासदांनी पाळावे व सदरील वेळेच्या नंतर कोणत्याही बाबी बाबत विचार केला जाणार नाही.
५) सदरील निवडणूक प्रक्रियेमध्ये कोणत्याही बाबी बाबत निवडणूक अधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण :- वसंतनगर, मुखेड
दिनांक :-२१/०७/२०२६

**स्वाक्षरीत**
**अॅड. मेघराज आर. चौधरी,**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
**विमुक्त जाती सेवा समिती, वसंतनगर,**
**कोटग्याळ, ता. मुखेड, जि. नांदेड.**

# जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ जुलै -**

मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीच्या औचित्याने राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात २२ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विधानसभा मतदारसंघनिहाय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, प्रत्येक मतदारसंघासाठी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाने नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने या समाधान शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, विविध दाखल्यांचे वितरण तसेच इतर शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती, अर्ज स्वीकारणे तसेच नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित समाधान शिबिरास आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच प्रलंबित प्रकरणे व तक्रारींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# शिवसेना अल्पसंख्यांक विभागाच्या भोकर विधानसभाध्यक्षपदी मोहम्मद बुऱ्हाण यांची नियुक्ती



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ जुलै -**

शिवसेना संघटना अधिक बळकट करण्यासह अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शिवसेना अल्पसंख्यांक विभागाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या नियुक्ती सोहळ्यात मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची भोकर विधानसभा अल्पसंख्यांक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

शिवसेनेचे नेते तथा विधान परिषदेचे गटनेते आमदार हेमंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती सोहळा पार पडला. शिवसेना अल्पसंख्यांक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार सईद खान यांच्या सूचनेनुसार तसेच शिवसेना भोकर विधानसभा नेते व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हाप्रमुख अनवर अहमद यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची शिवसेना (शिंदे गट)भोकर विधानसभा अल्पसंख्यांक अध्यक्ष, शेख मुकीद शेख जानीमिया यांची मुदखेड तालुका अध्यक्षपदी, तर सय्यद जब्बार सय्यद जाफर यांची भोकर तालुकाध्यक्ष, शेख समीर शेख जैनुद्दीन यांची मुदखेड शहराध्यक्ष आणि शेख इब्राहिम यांची भोकर शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला शिवसेना भोकर तालुकाप्रमुख माधव पाटील वडगावकर,युवक तालुकाप्रमुख दर्शन पाटील डुरे, मुदखेड उपतालुकाप्रमुख बाळू पाटील मंगल, सचिन पाटील किन्हाळकर, राहुल चौदंते, शेख हकीम मुजीब भाई यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आणि अल्पसंख्यांक समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिवसेनेची विचारधारा व विकासाची भूमिका पोहोचविण्याचे आवाहन केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याची ग्वाही दिली.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार असिफोद्दीन हुसानोद्दीन रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ०.३९.२५ हे. आर. या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ०.३९.२५ हे. आर. या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार मोइनोद्दीन तुराबोद्दीन व इतर रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र १ हे १६.६७ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) अन्वये झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र १ हे १६.६७ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) अन्वये झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपातरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**



धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोन चालकांविरुद्ध कळंब पोलीसांनी स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.१० ते ७.४० वाजण्याच्या दरम्यान येरमाळा-कळंब मार्गावरील शिवाजी महाराज चौक येथे वाहन तपासणीदरम्यान सुरज फुलचंद काळे (वय ३०, रा. टोकणी पारधी पिढी, कोठाळवाडी, ता. कळंब) हा एमएच २५ बीएल १५०८ क्रमांकाची दुचाकी, तर लखन गणपत जाधव (वय ३०, रा. पिंपळगाव डोळा, ह.मु. सात्रा पाटी, ता. कळंब) हा एमएच २५ एक्स ७२०३ क्रमांकाची दुचाकी मद्यधुंद अवस्थेत चालविताना आढळून आला.

दोन्ही चालकांनी मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ चे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल केले असून, पुढील कारवाई सुरू आहे.

## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वाशीत आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ जुलै -**



धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथे सोमवारी (दि. २० जुलै) भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

सोनम वांगचूक यांच्यावरील कथित दडपशाही तसेच नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आंदोलकांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. शिक्षण क्षेत्रातील गैरव्यवस्था आणि परीक्षा प्रक्रियेतील त्रुटींसाठी केंद्रीय शिक्षणमंत्री जबाबदार असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

आंदोलनानंतर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता सुनिश्चित करणे, विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करणे तसेच नीट परीक्षा पेपरफुटी आणि इतर संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनाचे नेतृत्व भाकपचे पंकज चव्हाण तसेच काँग्रेसचे अमर तागडे, अशोक माने, अजित माळी, किरण ढेपे आणि उल्हास लाखे यांनी केले. यावेळी शुभम तातूडे, ऋतूपर्ण गालफाडे, जीवन चौघुले, ड. सुनील चौधरी, हनुमंत सुकाळे, बाळासाहेब बनसोडे, पिंटू अडागळे, गजानन जगताप, निकिता देशमुख, युवराज रसाळ यांच्यासह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चाकूचा धाक दाखवून दाम्पत्याला लुटले; ३७ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**




बार्शीहून मोटारसायकलवरून गावाकडे परतणाऱ्या दाम्पत्याला चार अज्ञात दरोडेखोरांनी अडवून चाकूचा धाक दाखवत मारहाण केली आणि रोख रक्कम, मोबाईल व सोन्याचे दागिने असा एकूण ३७ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेल्याची घटना परंडा तालुक्यातील बावचीजवळील दुधी शिवारात घडली.

**परंडा तालुक्यातील बावचीजवळील दुधी शिवारातील घटना**

याबाबत परंडा पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, नवनाथ लक्ष्मण तनपुरे (वय ५६, रा. बावची, ता. परंडा) हे पत्नीसह १८ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजता मोटारसायकलवरून बार्शीहून गावाकडे जात होते. दुधी शिवारातील बिभीषण रोडगे यांच्या शेताजवळ चार अज्ञात व्यक्तींनी स्वतःची मोटारसायकल आडवी लावून त्यांचा मार्ग अडविला. त्यानंतर चाकूचा धाक दाखवत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांच्या ताब्यातील ५ हजार रुपये रोख, मोबाईल फोन आणि सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण ३७ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने लुटून आरोपी पसार झाले.

याप्रकरणी नवनाथ तनपुरे यांनी २० जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अज्ञात आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

## आयडीबीआय बँकेकडून तुळजाभवानी मंदिर संस्थानाला सीएसआर अंतर्गत ६ लॅपटॉप भेट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानातील भाविकांना आधुनिक व तंत्रज्ञानाधारित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आयडीबीआय बँकेने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) उपक्रमांतर्गत ६ लॅपटॉप मंदिर संस्थानाला प्रदान केले.

तुळजापूर शाखेचे व्यवस्थापक पंकज खरोटे यांच्या हस्ते हे लॅपटॉप मुख्य कार्यकारी अधिकारी उपेंद्र तामगेरे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, खउइख बँकेचे अधिकारी तसेच मंदिर संस्थानाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यापूर्वी मार्च २०२६ मध्ये सीएसआर बँकेने सीएसआर अंतर्गत मंदिर संस्थानाला टाटा सीई ईव्ही वाहनही दिले होते.

बँकेच्या या सहकार्यामुळे संस्थानाच्या प्रशासकीय कामकाजात कार्यक्षमता वाढण्यासह भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होत असल्याबद्दल मंदिर संस्थानातर्फे सीएसआर बँकेचे आभार व्यक्त करण्यात आले.

## आषाढी वारीसाठी येरमाळ्यात विशेष आरोग्य बूथ; साडेतेराशेहून अधिक वारकऱ्यांवर उपचार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ जुलै -**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, येरमाळा यांच्या वतीने बार्शी रोडवर १५ जुलैपासून विशेष आरोग्य बूथ सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमातून आतापर्यंत साडेतेराशेहून अधिक वारकऱ्यांना मोफत वैद्यकीय सेवा देण्यात आली आहे.

खानदेश, विदर्भ तसेच राज्याच्या विविध भागांतून शेकडो दिंड्या येरमाळा मार्गे पंढरपूरकडे जात असल्याने या मार्गावर वारकऱ्यांची मोठी गर्दी असते. लांब पायी प्रवासामुळे होणारा थकवा, ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी तसेच किरकोळ दुखापतींवर तातडीने उपचार मिळावेत, या उद्देशाने आरोग्य विभागाने हा उपक्रम हाती घेतला आहे.

आरोग्य बूथवर वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि आरोग्य कर्मचारी वारकऱ्यांची तपासणी करून आवश्यक औषधे मोफत देत आहेत. तसेच संसर्गजन्य आजारांपासून बचाव, वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्यविषयक खबरदारीबाबत मार्गदर्शनही केले जात आहे. दररोज सुमारे ३०० ते ३५० वारकऱ्यांवर प्राथमिक उपचार करण्यात येत असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधाकर बिरादार यांनी दिली.




या उपक्रमात आरोग्य सेवक शैलेश खारगे, गट प्रवर्तक प्रज्ञा जाधव, पर्यवेक्षिका एम. एस. सुतार तसेच आशा कार्यकर्त्या आशा जावळे, ज्योती बारसकर, अर्चना आगलावे, विद्या कोकाटे आणि अश्विनी जाधव या वारकऱ्यांना सेवा देत आहेत. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या या आरोग्य बूथमुळे हजारो वारकऱ्यांना वेळेवर उपचार मिळत असून, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या या सेवाभावी उपक्रमाचे भाविकांकडून स्वागत व कौतुक केले जात आहे.

## रुईभर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व केंद्रप्रमुख डॉ. शिवाजी चव्हाण यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच डॉ. शिवाजी चव्हाण यांची केंद्रप्रमुखपदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे होते. प्रमुख अतिथी म्हणून शिवाजी पवार गुरुजी उपस्थित होते. यावेळी डॉ. शिवाजी चव्हाण यांचा शाल, श्रीफळ देऊन तर गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सन २०२५-२६ च्या एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यालयातील १६८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला. प्रास्ताविकात प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनी परीक्षेचा आढावा घेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी सातत्यपूर्ण परिश्रम आणि जिद्दीने तयारी करण्याचे आवाहन केले. एटीएस प्रज्ञाशोध परीक्षा ही विद्यार्थ्यांना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची उत्तम संधी असून कठोर परिश्रमातूनच यश मिळते, असे ते म्हणाले. सत्कारमूर्ती डॉ. शिवाजी चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्पर्धात्मक परीक्षांची नियमित तयारी करण्याचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये आई-वडील आणि शिक्षकांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अरुण माने यांनी केले.

## आषाढी एकादशीनिमित्त एकलव्य विद्या संकुलात भक्तिमय कीर्तन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

एकलव्य विद्या संकुल, मंगरूळ (यमगरवाडी) येथे आषाढी एकादशीनिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात अध्यात्म, विज्ञान आणि समाजप्रबोधनाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. लातूर येथील प्रसिद्ध महिला कीर्तनकार सीमा विवेक अयाचित यांनी आपल्या प्रभावी निरूपणातून विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कीर्तनात त्यांनी पंढरपूरच्या विठ्ठल भक्तीचे महत्त्व, आषाढी वारीची परंपरा आणि लाखो वारकऱ्यांची अखंड श्रद्धा यांचे भावपूर्ण विवेचन केले.

महाराष्ट्रासह विविध राज्यांतील भाविक विठ्ठल... विठ्ठल... नामाचा गजर करत दिंड्यांमधून पंढरपूरला कसे पोहोचतात, याचे जिवंत चित्र त्यांनी उभे केले. अध्यात्माची सांगड विज्ञानाशी घालत समाजप्रबोधनपर विचार मांडताना विद्यार्थ्यांना बोधकथांद्वारे नैतिक मूल्ये, संस्कार आणि सकारात्मक जीवनदृष्टीचा संदेश दिला. या कीर्तनाला संकुलाचे माजी विद्यार्थी अतुल यमगर यांनी तबल्याची, तर सहशिक्षक संतोष बनसोडे यांनी पेटीची उत्कृष्ट साथ दिली. तसेच यमगरवाडी येथील मोहन वाघमोडे यांच्या भजनी मंडळातील सदस्यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या वतीने सुजाता गणवीर यांच्या हस्ते कीर्तनकार सीमा अयाचित यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अस्मिता भोजने आणि रूपाली गिरी यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय संस्कार सुपलकर यांनी करून दिला.

यावेळी मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोलटकर, फुलाजी ताटी कुंडलवार, संगीता पाचंगे, निर्मला हुग्गे, प्राणिताबाई शेटकार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

आषाढी एकादशीनिमित्त आयोजित या कीर्तन सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

## तिरट मटका जुगारावर छापा

**धाराशिव, दि.२१ जुलै -**

आनंदनगर पोलीसांनी जुगारविरोधी कारवाईत सेवालाल कॉलनी परिसरातील तेरणा कॉलेजलगत असलेल्या हॉटेलवर छापा टाकून तिरट मटका जुगार खेळणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दि. १९ जुलै रोजी नागेश दत्ता वैरागे, पवन माणिक राठोड, नवनाथ श्रीरंग पवार आणि सोमा उर्फ समर्थ बालाजी राठोड (सर्व रा. सेवालाल कॉलनी, धाराशिव) यांच्याकडून तिरट मटका जुगाराचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण ४ हजार ६६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## परंड्यात संत भगवान बाबा पालखीचे भक्तिमय स्वागत; 10 हजार वारकऱ्यांसाठी भोजन, पाणी व आरोग्यसेवेची व्यवस्था





**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ जुलै -**

आषाढी वारीनिमित्त भगवानगड येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री संत भगवान बाबा यांच्या पालखीचे सोमवारी (२० जुलै) परंड्यातील कल्याणसागर विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या जयघोषात पालखीचे आगमन झाल्याने परिसर भक्तिमय झाला.

यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, शैला ठाकूर व उपनगराध्यक्ष समरजीत ठाकूर यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक, भाजप पदाधिकारी, नगरसेवक तसेच कल्याणसागर समूहाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पालखीसोबत आलेल्या सुमारे १० हजार वारकऱ्यांसाठी भोजन, पिण्याचे पाणी व आरोग्यसेवेची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पालखी सोहळा सुरळीत पार पडावा यासाठी परंडा पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. संत भगवान बाबा पालखीच्या दर्शनासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

## आई-वडिलांच्या स्मरणार्थ स्वखर्चाने आळंदी-पंढरपूर दिंडी; ८०० वारकऱ्यांची नि:शुल्क वारी

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२१ जुलै -**

आई-वडिलांच्या पांडुरंगभक्तीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सुस्ते (ता. पंढरपूर) येथील ह.भ.प. बाळासाहेब नामदेव चव्हाण यांनी गेल्या चार वर्षांपासून स्वखर्चाने आळंदी ते पंढरपूर आषाढी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन केले आहे. या दिंडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचा संपूर्ण खर्च स्वतः उचलत ते सर्वसामान्य भाविकांना निःशुल्क वारी घडवून आणत आहेत.

यंदा या दिंडीचे चौथे वर्ष असून सुमारे ८०० वारकरी सहभागी झाले आहेत. या दिंडीत नळदुर्ग, अणदूर, खुदावाडी परिसरातील वारकऱ्यांचा मोठा सहभाग आहे. सामान्य कुटुंबातील आणि आर्थिक अडचणीमुळे इतर दिंड्यांमध्ये सहभागी होऊ न शकणाऱ्या वारकऱ्यांना पंढरपूरची वारी घडवून आणण्याचा संकल्प बाळासाहेब चव्हाण यांनी केला. आई-वडिलांच्या स्मरणार्थ सुरू केलेला हा उपक्रम त्यांनी सातत्याने चार वर्षे जपला आहे.





दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी १५ महिला चपाती बनविण्यासाठी, १० स्वयंपाकी, १५ मदतनीस, स्वयंसेवक, ६ मजूर तसेच दिंडीसोबत ३० लहान-मोठी वाहने कार्यरत आहेत. पिण्यासाठी शुद्ध फिल्टर पाणी, अंघोळ व कपडे धुण्यासाठी पाण्याचे टँकर, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र १०-१० स्वच्छतागृहे व स्नानगृहे अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दिंडीत सहभागी प्रत्येक वारकऱ्याला मोफत प्रवास, प्रसाद, पावसाळी रेनकोट देण्यात येतो. महिला वारकऱ्यांना प्रत्येकी दोन साड्या, तर पुरुष वारकऱ्यांना टॉवेल भेट दिला जातो. मुक्कामासाठी मंगल कार्यालयांमध्ये निवासाची व्यवस्था करून आवश्यक सर्व सुविधा पुरविण्यात येतात.

वारकरी परंपरेनुसार दिंडीचा नित्यक्रमही शिस्तबद्ध असतो. पहाटे काकड आरतीने दिवसाची सुरुवात होते. त्यानंतर चहा, नाश्ता, दुपारचे भोजन, सायंकाळचा चहा आणि रात्रीचे भोजन अशा वेळापत्रकानुसार व्यवस्था केली जाते. दररोज २० ते २२ किलोमीटर पायी प्रवास करत वारकरी नामस्मरण, भजन करत मार्गक्रमण करतात. मुक्कामाच्या ठिकाणी हरिपाठ आणि कीर्तनाचे आयोजन केले जाते. ह.भ.प. बाळासाहेब नामदेव चव्हाण यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे वारकरी संप्रदायात कौतुक होत असून, सर्वसामान्य भाविकांना नि:शुल्क आषाढी वारी घडवून आणण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी मानले जात आहे.

या उपक्रमात दगडू जोडभावे गुरुजी (प्रवचनकार), सोपान कापसे, बाबुराव मुळे, आप्पासाहेब आलुरे, तानाजी पोतदार आणि शांतेश्वर बोंगरगे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

## भरधाव कारच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यु; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जुलै -**

राष्ट्रीय महामार्ग ५२ वरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ भरधाव व निष्काळजीपणे चालविलेल्या कारने पाठीमागून धडक दिल्याने ५७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना वाशी तालुक्यात घडली. याप्रकरणी कारचालकाविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरी दिगंबर शिंदे (वय ५७, रा. बारलोनी पारधी पिढी, ता. वाशी, जि. धाराशिव) हे ११ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजता भाऊ अनिल शिंदे यांच्यासमवेत हॉटेलमध्ये जेवण करून राष्ट्रीय महामार्ग ५२ वरून जात होते. त्यावेळी इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ कार (क्र. एमएच १२ ईएम ४४७३) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत हरी शिंदे यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात हरी शिंदे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी २० जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १०० टक्के व्याजमाफीला तीन दिवसांची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१ जुलै -**

शिवछत्रपती प्रतिष्ठान, शेंद (पश्चिम) लातूर शहर महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी जाहीर केलेल्या १०० टक्के व्याजमाफी योजनेस आणखी तीन दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे नागरिकांना २१ ते २३ जुलै या कालावधीत थकीत कर भरून या सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

यापूर्वी ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्यांना व्याजशास्तीत १०० टक्के सवलत देण्यात आली होती. या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून सुमारे ६,३०० मालमत्ताधारकांनी थकीत कराचा भरणा केला. मात्र, काही करदाते अद्यापही थकबाकीदार असल्याने आणि योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी होत असल्याने महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे आणि विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनाला मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी योजनेस तीन दिवसांची मुदतवाढ मंजूर केली.

महापालिकेच्या कर संकलन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### उजनीचे समाजसेवक मनसुर रुईकर यांना 'समाजरत्न' पुरस्कार

**औसा, दि.२१ जुलै -**

राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समितीच्या वतीने देण्यात येणारा 'समाजरत्न' पुरस्कार यंदा औसा तालुक्यातील उजनी येथील समाजसेवक मनसुर जरीबखान रुईकर यांना प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यात मराठवाडा विभागाचे आरटीओ आयुक्त विजय काठोडे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुस्लिम विकास परिषदेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय समाजकार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समितीचे पदाधिकारी तसेच मान्यवर उपस्थित होते.

### लातूरमध्ये वाहतूक नियमभंगाविरोधात विशेष मोहीम

**लातूर, दि.२१, जुलै -**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालून नागरिकांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाकडून वाहतूक नियमांची जनजागृती आणि नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २६२ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील वाहतूक नियंत्रण शाखा आणि विविध पोलीस ठाण्यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १९ जुलै या कालावधीत ही मोहीम राबविण्यात आली. वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यावर पोलीस प्रशासनाने भर दिला आहे. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बळीराजाच्या नजरा आकाशाकडे..! दमदार पावसाची अद्यापही प्रतिक्षाच!

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

पावसाळ्याची सुरुवात होऊन आता जवळपास दिड महिना उलटूनही लातूर जिल्ह्यात अद्याप मोठा पाऊस झालेला नाही. नाही म्हणायला सुरुवातीला झालेल्या किरकोळ पावसाने काही शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरण्या उरकल्या, मात्र आता पावसाअभावी दुबार प्रेणीचेसंकट आ वासून उभे राहिले आहे.

त्यामुळे बळीराजाच्या नजरा आजही आकाशाकडे लागल्या असून दमदार पावसाची सर्वांना प्रतिक्षा आहे. मागच्या काही वर्षात सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जीवाची अक्षरशः काहिली झाली. तेव्हा नागरिकांना कधी एकदा असह्य उन्हाळा संपून पावसाळा सुरु होतो, असे झाले होते. एकदा का उन्हाळा संपला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पावसाळा सुरु झाल्याबरोबर काही दिवस उलटून गेल्यानंतर का होईना पण दमदार पाऊस होईल, या आशेवर शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकही होते. पाऊस आज पडेल, उद्या पडेल या आशेवर असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह प्रत्येकाला



वरून राजाने गुंगारा दिला. नाही म्हणायला जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झाला, परंतु तो जिल्हाभरात सर्वदूर झाला नाही. ज्या भागात पाऊस झाला, त्या भागातील पिके तग धरून आहेत. परंतु हीच स्थिती जिल्ह्यात सगळीकडे दिसून येत नाही. एकंदर परिस्थितीवरून आजमितीस खरीप हंगाम धोक्यात आला आहे, असे म्हटल्यास नवल वाटू नये. गेल्या चार पाच दिवसात आकाशात ढग मोठ्या प्रमाणात जमलेले पाहायला मिळतात. अनेकदा वातावरण असे निर्माण होते की, थोड्याच वेळात जोरदार पाऊस सुरु होईल. परंतु थोडासा सडा टाकल्याप्रमाणे पावसाचे चार थेंब पडतात आणि ढग निघून जातात. ढगाळ वातावरणामुळे वातावरणातील धगही बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. हवामान विभाग आणि पंचांगातहीयेणाऱ्या काही दिवसात समाधान कारक पाऊस होणार असल्याचे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात वरुणराजाची कृपादृष्टी होण्याचे संकेत वर्तवले जात आहेत. हवामान विभागापेक्षा अनेक लोक आजही पंचांगांवर अधिक विश्वास ठेवून चालतात,असेही निदर्शनास आले आहे. काही का असेना, एकंदर परिस्थितीवरून बळीराजासह सामान्य नागरिकांचाहीनजरा आकाशाकडे लागल्याचेदिसून येत आहे.

मोठ्या पावसाअभावी जिल्ह्यातील धरणातील पाणी पातळीही दिवसेंदिवस खालावत चालली आहे. आणखी काही दिवस वरुण राजाची कृपादृष्टी नाही झाल्यास पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## एसआयआर आणि शिक्षणाचा समतोल साधण्याची गरज!

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर नियुक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शाळांची वेळ सकाळी ७.३० ते १२.३० अशी बदलली असून, बीएलओ नसलेल्या शिक्षकांनीही बीएलओंना मदत करावी, असे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात या आदेशांची अंमलबजावणी समान पद्धतीने होताना दिसत नाही.

ज्या शिक्षकांकडे बीएलओची जबाबदारी आहे, ते दुपारपासून सायंकाळपर्यंत मतदार यादीच्या कामात व्यस्त असतात. दुसरीकडे, बीएलओ नसलेले अनेक शिक्षक शाळा सुटल्यानंतर घरी जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे काही शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असताना, काहींवर तुलनेने कमी जबाबदारी असल्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे एसआयआरचे काम सर्व शिक्षकांमध्ये समान पद्धतीने वाटून देण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे बदललेल्या शाळेच्या वेळेचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम. दुपारी शाळा सुटल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांच्या घरी पालक नसतात. परिणामी, काही विद्यार्थी अभ्यासाऐवजी वेळ वाया घालवत असल्याची तक्रार पालकांकडून होत आहे. याचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि भविष्यातील जडणघडणीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याच पार्श्वभूमीवर एसआयआरचे काम शिक्षकांऐवजी इतर प्रशासकीय यंत्रणांकडे सोपविण्याची मागणी पुढे येत आहे. नगरपरिषद, महानगरपालिका, तहसील कार्यालयातील कर्मचारी किंवा इतर शासकीय यंत्रणांकडून हे काम करून घेता येईल, असा सूर व्यक्त होत आहे. काहींच्या मते, स्थानिक लोकप्रतिनिधींनाही या प्रक्रियेत जबाबदारी दिल्यास त्यांचा प्रभागाशी अधिक संपर्क वाढू शकतो.

शिक्षकांवर निवडणूक, जनगणना, सर्वेक्षण, विविध शासकीय मोहिमा अशा अनेक अतिरिक्त जबाबदाऱ्या वारंवार सोपवल्या जातात. शिक्षक ही कामे प्रामाणिकपणे पार पाडत असले तरी त्याचा परिणाम अध्यापनावर होतो, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही.

शिक्षकांचे मुख्य कार्य म्हणजे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि भावी पिढी घडविणे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होणार नाही, अशा पद्धतीने एसआयआर आणि इतर प्रशासकीय कामांचे नियोजन करण्याची गरज आहे.

शिक्षकांना अध्यापनासाठी अधिक वेळ मिळावा आणि प्रशासकीय कामांसाठी पर्यायी यंत्रणा उभी करावी, अशी अपेक्षा अनेक पालक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## वाचनसंस्कृतीच्या जनजागृतीसाठी पुणे-आळंदी-पंढरपूर सायकलवारीचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

माणूस प्रतिष्ठान संचालित माझं घरच्या पुढाकाराने वाचनसंस्कृती, पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि सायकल संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पुणे-आळंदी-पंढरपूर सायकलवारीचा सोमवारी (ता. २०) समारोप झाला.

शरद झरे, डॉ. विनोद चव्हाण आणि डॉ. पवन चांडक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सायकलवारीत सहभागी सायकलपटूंनी मार्गातील नागरिक, विद्यार्थी व वारकऱ्यांमध्ये 'मोबाइलला सुट्टी, पुस्तकाशी गट्टी', 'वाचाल तर वाचाल', 'सायकल चालवा-इंधन वाचवा, आरोग्य जपा' तसेच 'झाडे लावा, पर्यावरण वाचवा' असे सामाजिक संदेश दिले. या उपक्रमात डॉ. भगवान केंद्रे, पांडुरंग मोरे, राहुल राठोड व अर्जुन कांबळे यांच्यासह अनेक जण सहभागी झाले. सायकलवारीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

समारोपावेळी सामाजिक जनजागृतीसाठी सायकलचा प्रभावी माध्यम म्हणून अधिक व्यापक वापर करण्याचा निर्धार सहभागी सदस्यांनी व्यक्त केला.

## शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या तक्रार निवारणावर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१, जुलै -**

शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या तक्रार निवारण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे प्रकरण समोर आले आहे. परिसरातील तुडुंब भरलेल्या नालीची स्वच्छता करण्यासाठी नागरिक धनंजय देवंगरे यांनी २६ मे २०२६ रोजी तक्रार निवारण नोंदवहीत लेखी तक्रार केली होती. मात्र, संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी तक्रारीवर '१८ मे २०२६ रोजी काम पूर्ण करण्यात आले' असा शेरा मारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली असता संबंधित नाली अद्यापही तुडुंब भरलेली असून तिची कोणतीही स्वच्छता झालेली नाही. विशेष म्हणजे, तक्रार नोंदविण्याची तारीख २६ मे असताना त्यापूर्वीच १८ मे रोजी काम पूर्ण झाल्याची नोंद करण्यात आल्याने तक्रार निवारण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**नाली साफ केल्याची नोंद, प्रत्यक्षात नाली तुडुंब...**

तक्रारदाराने असा सवालही उपस्थित केला आहे की, जर नालीची स्वच्छता खरोखरच १८ मे रोजी झाली असेल, तर अवघ्या आठ दिवसांत ती पुन्हा तुडुंब कशी भरली? या प्रकरणात वस्तुस्थितीची पडताळणी न करताच तक्रार निकाली काढल्याचा आरोप करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी तसेच संबंधित नालीची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी धनंजय देवंगरे आणि परिसरातील नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत स्वच्छता निरीक्षक प्रशांत झांबरे तसेच शिरूर अनंतपाळ नगरपंचायत प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गोसावी वूमेन्स विंग, लातूर यांच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान, धान्य तसेच जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

धार्मिक सणाचे औचित्य साधत समाजोपयोगी कार्य करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## पोषण आहार योजनेतील कथित ८५ हजारांच्या अनियमिततेप्रकरणी मुख्याध्यापक निलंबित

**तभा वृत्तसेवा**
**मुरूड, दि.२१, जुलै -**

लातूर जिल्ह्यातील मुरुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारुनगर येथील शालेय पोषण आहार योजनेतील कथित ८५ हजार ०१३ रूपये आर्थिक अनियमिततेप्रकरणी मुख्याध्यापक हेमंत डी. जोशी यांना जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीणा यांनी निलंबित केले आहे. शिक्षण विभागाच्या चौकशी अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली असून शिक्षण क्षेत्रात या निर्णयाची चर्चा सुरू आहे.

तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे व शिक्षण विभागाच्या चौकशीत विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात पोषण आहार तयार करणे, तांदूळ शिल्लक ठेवणे, शासनाची पूर्वपरवानगी न घेता ६०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक किलोप्रमाणे ६०० किलो तांदूळ वाटप करणे आणि पोषण आहार योजनेत ८५ हजार ०१३ रूपयांची कथित आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच शासनाची दिशाभूल केल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे.

तक्रारीमध्ये तांदळासह डाळी, कडधान्ये, खाद्यतेल, मसाले व इतर साहित्याच्या वापरात अनियमितता, स्काऊट-गाईड गणवेश वितरणातील कथित गैरव्यवहार, पालकांकडून अतिरिक्त रक्कम वसूल करणे तसेच विकास निधीच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर वसुली केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले होते. मुख्याध्यापकांकडे केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक अशी दुहेरी जबाबदारी असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवरही परिणाम झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी शिक्षण विभागाने यापूर्वी कारणे दाखवा नोटीस बजावून १३ एप्रिल २०२६ रोजी कथित अनियमिततेची ८५ हजार ०१३ रूपये रक्कम शासन खात्यात जमा करण्याचे आदेश दिले होते. मात्र, मुख्याध्यापकांनी संबंधित खर्च बचत गटामार्फत झाल्याचा खुलासा केला.

शाळेच्या शासकीय निधीची अंतिम जबाबदारी सचिव म्हणून मुख्याध्यापकांचीच असल्याचे स्पष्ट करत प्रशासनाने हा खुलासा फेटाळून लावला.

या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा ग्रामीण पत्रकार संघ, पत्रकार श्रीकांत टिळक आणि भीम क्रांती संघटनांनी केला होता. त्यांच्या तक्रारीनंतर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावर पत्रव्यवहार झाला. शासनाच्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीणा यांनी निलंबनाची कारवाई केली.

मुख्याध्यापकांच्या निलंबनानंतर या प्रकरणाची विभागीय चौकशी होण्याची शक्यता असून आणखी गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्राथमिक चौकशीपासून निलंबनाच्या निर्णयापर्यंत सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## मूलभूत सुविधांसाठी आर्वी गायरान पुनर्वसितांचा महापालिकेवर ठिय्या; थाळीनाद आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

रेल्वे पटरीलगतच्या परिसरातून सुमारे २३ वर्षांपूर्वी आर्वी गायरान येथे पुनर्वसित करण्यात आलेल्या नागरिकांना अद्यापही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसल्याच्या निषेधार्थ सोमवारी महिलांसह नागरिकांनी लातूर महानगरपालिकेच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन करत थाळीनाद केला.

महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात, नगरपालिकेने पुनर्वसन केल्यानंतरही पाणी, रस्ते, वीज, गटार यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या नसल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, आर्वी ग्रामपंचायतीकडूनही संबंधित नागरिक लातूरचे मतदार असल्याचे कारण देत सुविधा दिल्या जात नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

आंदोलनाची सुरुवात आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर थाळीनाद आंदोलनाने करण्यात आली. त्यानंतर नागरिकांनी मोर्चा काढून महापालिकेत धडक दिली. महापालिका आयुक्तांनी मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात पँथर संघर्ष संघटनेचे संस्थापक ॲड. धम्मदीप बलांडे, शहराध्यक्ष नीलेश कांबळे, अशोक कांबळे, शीलरत्न गायकवाड यांच्यासह महिला व नागरिक सहभागी झाले होते.

## लातूरमध्ये २४ जुलै रोजी 'भक्तिरंग - एक संगीतमय वारी' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त 'भक्तिरंग - एक संगीतमय वारी' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, २४ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे होणार आहे.

संतवाणी, अभंग आणि भक्तिसंगीताच्या माध्यमातून विठ्ठलभक्ती, संतपरंपरा आणि वारकरी संस्कृतीचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमातून सादर केला जाणार असून, लातूरकर रसिकांना भक्ती आणि संगीताचा अविस्मरणीय अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसपूर्ण सांगीतिक वारीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## आषाढी यात्रेपूर्वी डोंगरशेळकी रस्ता दुरुस्त करा; ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१, जुलै -**

मराठवाड्याचे 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगरशेळकी तीर्थक्षेत्राकडे जाणारा गंडी पाटी-डोंगरशेळकी-गुडसूर हा मुख्य रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून, आषाढी यात्रेपूर्वी त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ, वाहनचालक आणि भाविकांकडून होत आहे.

रस्त्यावर मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि पावसामुळे साचणारे पाणी यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून, या मार्गावर लहान-मोठे अपघातही घडत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. येत्या २५ जुलै रोजी डोंगरशेळकी येथे आषाढी यात्रा भरत असून, धोंडूतात्यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक या मार्गाने येण्याची शक्यता आहे. मात्र, रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करण्यात येत असली तरी संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

## आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य!

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१, जुलै -**

तालुक्यातील आरी मोड ते शिरूर अनंतपाळ शहराला जोडणारा सुमारे चार किलोमीटरचा मुख्य रस्ता मोठमोठ्या खड्ड्यांमुळे धोकादायक बनला असून, या मार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. त्यामुळे रस्त्याची तातडीने डागडुजी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विशेषतः घरणी प्रकल्पाच्या कालव्यापासून शिरूर अनंतपाळ शहरापर्यंत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात वाहनांची समोरासमोर धडक होत असून, अनेक नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. वारंवार अपघात होत असतानाही संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

**अपघातांच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या दुरुस्तीची मागणी**

आरी मोड ते देवणी तालुक्यातील लासोना दरम्यान दोन पदरी सिमेंट रस्त्याचे काम सुरू असले तरी कामाची सुरुवात देवणीकडून करण्यात आल्याने आरी मोड-शिरूर अनंतपाळ हा



महत्त्वाचा टप्पा दुर्लक्षित राहिला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सिमेंट नाल्यांचे काम पूर्ण झाले असले तरी रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. या मार्गावर तहसील कार्यालय, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, तालुका कृषी कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय असल्याने दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. तसेच लातूर, निलंगा, नळेगाव आदी भागांतून शेकडो वाहने या मार्गाने प्रवास करतात.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागात कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने तालुक्यातील अनेक रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांकडूनही या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

वाढते अपघात रोखण्यासाठी आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### कातपूर येथे उद्योग योजनांची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपूर येथे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उद्योग व स्वयंरोजगार योजनांची जनजागृती करण्यात आली.

राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अदितीताई अमित देशमुख यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास संगीता मोळवणे, उपसरपंच मनोज देशमुख, गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह कातपूर परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.